रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

• वर्ष १५ • अंक २६०
www.ramprahar.com

रविवार, ९ एप्रिल २०२३ • पाने ८ • किंमत ₹२

## अंतरंग

'उद्योजक बनून देशाची अर्थव्यवस्था बळकट करा'/२
रविवारनिमित्त 'रविप्रहर'मध्ये विविध विषयांवरील लेख/४
कोरोनाशी मुकाबला करण्यासाठी यंत्रणा सज्ज/७

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे लखनऊमध्ये दाखल; जंगी स्वागत



**लखनऊ :** अयोध्या दौऱ्यावर गेलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शनिवारी (दि. ८) आमदार, खासदार, पदाधिकाऱ्यांसह लखनऊमध्ये पोहचले. उत्तर प्रदेशचे एक मंत्री शिवसेना नेत्यांच्या स्वागतासाठी लखनऊ विमानतळावर हजर झाले होते. रामभक्तांचीही विमानतळ परिसरात गर्दी होती. पुष्पहारांनी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. या वेळी मुख्यमंत्री प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना म्हणाले की, अयोध्या हा आमच्यासाठी श्रद्धेचा विषय आहे. मुख्यमंत्री झाल्यानंतर मी पहिल्यांदाच अयोध्येला येत असून लखनऊ ते अयोध्या भक्तिमय वातावरण तयार झालेले आहे. पुढे बोलताना त्यांनी, २०१९मध्ये महाराष्ट्रामध्ये झालेली चूक आम्ही सुधरवली आहे. आम्ही लोकांच्या मनातले सरकार आणलेले आहे. असे असले तरी अयोध्येत आम्ही पक्षीय राजकारण आणणार नाही. आम्ही प्रभू रामाच्या दर्शनासाठी आलोत, असे सांगितले.

## मोखाडा येथे महाविद्यालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन व नामकरण; मान्यवरांची उपस्थिती

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे दातृत्व 'रयत'च्या पाठीशी

### संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांचे गौरवोद्गार



(छाया : भालचंद्र जुमलेदार) अधिक छायाचित्रे पान ८ वर..

**मोखाडा : हरेश साठे**

राजकारण बाजूला सारून सामाजिक हितासाठी सातत्याने कार्य करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे दातृत्व रयत शिक्षण संस्थेच्या पाठीशी कायम आहे, असे गौरवोद्गार संस्थेचे अध्यक्ष पद्मविभूषण खासदार शरद पवार यांनी शनिवारी (दि. ८) मोखाडा येथे काढले. सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, कला, क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांत सदैव उल्लेखनीय कार्य करणारे, दानशूर व्यक्तिमत्व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नावाने रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी वर्षानिमित्त बांधण्यात आलेल्या पालघर जिल्ह्यातील मोखाडा येथील महाविद्यालयाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन व लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नामकरण समारंभ खासदार शरद पवार यांच्या हस्ते झाला. त्या वेळी ते बोलत होते.

खासदार शरद पवार आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, एक शाळा असलेली रयत शिक्षण संस्था आशिया खंडातील क्रमांक एकची संस्था झाली आहे ती अनेकांच्या योगदानामुळे. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर अण्णांनी शिक्षण कार्यातून महाराष्ट्राला दिशा देण्याचे काम केले. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाच्या विस्तारासाठी महत्त्वपूर्ण काम केले आणि हाच आदर्श कर्मवीर अण्णांनी घेतला आणि त्यामुळे या संस्थेच्या शाखा विस्तारल्या. त्यातील मोखाडा ही एक शाखा असून आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण कसे देता येईल यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

राजकारण बाजूला ठेवून शिक्षण कार्यात लक्ष देत लोकनेते रामशेठ ठाकूर संस्थेच्या मदतीला धावून येतात त्या वेळी त्या शाखेचा विकासात्मक बदल घडत असते. कमवा आणि शिका या उद्देशातून शिकलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपले व्यक्तिगत जीवन सुधारत असताना रयत शिक्षण संस्थेला मदत करण्याचे काम अखंडपणे सुरू ठेवले आहे, असे नमूद करतानाच त्यांचे संस्थेप्रती एकही वर्ष मदतीशिवाय जात नसल्याचे खासदार शरद पवार यांनी अधोरेखित केले. येथील विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवर चमकणार आहेत, कारण येथील आदिवासींच्या जीवनात विकासाचे परिवर्तन घडविण्याचे काम लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले आहे, असेही त्यांनी या वेळी आवर्जून नमूद केले.

या वेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री व पालघरचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण म्हणाले की, येथील दुर्गम भागात उभारलेली इमारत पाहिली असता आदर्श मॉडेल अशी ही वास्तू आहे. पालघर जिल्ह्यात विद्यार्थ्यांची शिक्षणासाठी असलेली वणवण पाहता सरकारी व्यवस्थेत सोयीसुविधांमध्ये अनेक अडचणी असताना लोकनेते रामशेठ ठाकूर या ठिकाणी पुढे आल्याने एक आदर्श वास्तू साकारली गेली. विशेष म्हणजे पनवेल परिसरात त्यांच्या विद्यालयाप्रमाणे ही इमारत उभी राहिली त्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे कौतुक करू तेवढे कमी आहे, असे गौरवोद्गार काढतानाच त्यांचा आदर्श सर्वांनी अंगीकारणे गरजेचे आहे, असेही त्यांनी म्हटले. त्याचबरोबर या ठिकाणी आश्रमशाळा उभारण्यात येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी मदत करण्याचे आश्वासन मंत्री चव्हाण यांनी दिले.

विधानसभेचे माजी सभापती तथा रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दिलीप वळसे-पाटील यांनी आपल्या भाषणात म्हटले की, समाजातील प्रत्येक व्यक्तीला शिक्षण मिळाले पाहिजे या हेतूने कर्मवीर अण्णांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. शंकरराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शरदराव पवार यांनी अध्यक्ष म्हणून संस्थेच्या प्रगतीसाठी आवश्यक असे काम केले आहे. रयत शिक्षण संस्थेच्या वाटचालीत अनेकांचे योगदान आहे. त्यामध्ये संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदराव पवार आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रचंड योगदान आहे. समाजात अनेक करोडपती आहेत, पण समाजाचे दुःख जाणून स्वतःचे देण्याचे काम त्यांनी केले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कमवा आणि शिका या योजनेतून शिक्षण घेतले, पुढे नोकरी केली, उद्योजक झाले. विद्यार्थीदशेपासून ते आजपर्यंत ते 'रयत'सोबत आहेत. स्वतःची शिक्षण संस्था असतानाही रयत शिक्षण संस्थेवर ते जीवापाड प्रेम करतात. लोकांसाठी काम करण्याची त्यांची भूमिका समाजाला प्रेरणा देणारी आहे, असेही त्यांनी सांगितले.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून खासदार राजेंद्र गावित, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार सुनील भुसारा, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, सचिव डॉ. विठ्ठल शिवणकर, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पत्नी वर्षा ठाकूर, चिरंजीव परेश ठाकूर, त्यांच्या पत्नी अर्चना ठाकूर, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, पालघर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, मोखाडा नगरपंचायतीचे नगराध्यक्ष अमोल पाटील, संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, वाय. टी. देशमुख, जे. एम. म्हात्रे, महेंद्र घरत, विनायक पाटील, मोखाडा पंचायत समितीचे सभापती भास्कर थेतले, संस्थेचे सहसचिव राजेंद्र साळुंखे, शिवलिंग मेनकुदळे, मध्य विभाग अध्यक्ष संजीव पाटील, लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. भोर, संस्थेचे माजी सचिव गणेश ठाकूर, आर. डी. निकम, बाबासाहेब भोर, पी. जी. पवार, के. जी. कानडे, किशोर काकडे, एस. के. पाटील, जे. जी. जाधव, सुभाष शिंदे, शहाजी डोंगरे, चंद्रकांत दळवी, रमेश सानप आदी प्राचार्य मंडळींसह महाराष्ट्राच्या कानाकोऱ्यातून मान्यवर मंडळी उपस्थित होते. पनवेलहून भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे, प्रकाश बिनेदार, संजय पाटील, राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, के. के. म्हात्रे, गोपीनाथ भगत, समीर ठाकूर, चारुशीला घरत, रत्नप्रभा घरत, वर्षा नाईक, कल्पना ठाकूर, सुशीला घरत, राजेश्री वावेकर, वृषाली वाघमारे, जयवंत देशमुख, प्रकाश भगत, संजय भगत, अजय भगत, अमृत भगत, विजय घरत, विश्वनाथ कोळी, शरद खारकर, अनंता ठाकूर, सी. एल. ठाकूर, सागर ठाकूर, दर्शन ठाकूर, स्वप्नील ठाकूर, नातू अपूर्व प्रशांत ठाकूर, आदेश परेश ठाकूर, आदित्य परेश ठाकूर उपस्थित होते. या वेळी रयत शिक्षण संस्था आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने ठाकूर कुटुंबीयांचा हृद्य सत्कार करण्यात आला.

> **मोखाडा कॉलेजला 'राम'स्पर्श झाला आहे. त्यामुळे हे महाविद्यालय वर्ल्डक्लास कॉलेज होणार. आयपीएस पोलीस भरती, आयटी कोर्स, करिअर गाईड असे विविध कोर्स या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येतील. येत्या चार वर्षांत हे महाविद्यालय उत्कृष्ट टेक्निकल कॉलेज असेल.**
>
> **-डॉ. अनिल पाटील, चेअरमन, रयत शिक्षण संस्था**

> **लोकनेते रामशेठ ठाकूर कर्मवीरांचे निष्ठावंत पाईक आहेत. ते लोकभावना जाणतात. म्हणूनच रामशेठ ठाकूर यांना लोकनेते म्हणतात. लोकांसाठी काम करायचे आहे अशी त्यांची सतत भूमिका राहिली असून त्यांची ही भूमिका समाजाला प्रेरणा देणारी आहे.**
>
> **-दिलीप वळसे-पाटील, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, रयत शिक्षण संस्था**



### लोकनेते रामशेठ ठाकूर समाजाप्रति आस्था, प्रेम असलेले व्यक्तिमत्त्व -मंत्री रवींद्र चव्हाण

*या वेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री व पालघरचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त करताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचा गौरव केला. अनेक जण फक्त भाषण करतात, पण असे फार कमी लोकं असतात ते समाजाप्रति असलेले ऋण फेडण्यासाठी काम करतात. लोकनेते रामशेठ ठाकूर हे समाजाप्रति आस्था आणि प्रेम असलेले व्यक्तिमत्त्व आहेत. त्यामुळे सर्व समाजात दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर यांची ओळख आहे. त्यांच्याकडे एखादा व्यक्ती मदतीसाठी गेला आणि तो रिकाम्या हाती आला असे कधीच झाले नाही, असे मंत्री चव्हाण यांनी सांगितले.*

### आम्हाला प्रेम दिले, कॉलेजला नाव दिले त्याबद्दल आभार -लोकनेते रामशेठ ठाकूर

**या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, शरद पवारसाहेबांनी कधीही पक्षभेद केला नाही. त्यांचे माझ्यावर नेहमीच प्रेम राहिलेले आहे. त्याचबरोबरीने दिलीप वळसे-पाटील, डॉ. अनिल पाटील यांनीही नेहमीच सहकार्य केले. भगीरथ शिंदे मोठ्या भावाप्रमाणे पाठीशी राहिले. आम्ही सर्व मिळून संस्थेसाठी एकदिलाने काम करीत आहोत. कर्तृत्व देण्यासाठी काम करणे गरजेचे असते. कर्मवीर अण्णांनी संस्थेने मला वळण दिले, त्याप्रमाणे आपण काम करीत आहोत. आधुनिक पद्धतीचे कोर्सेस या मोखाडा महाविद्यालयात उपलब्ध करून देत हे महाविद्यालय नामवंत होईल यासाठी प्रयत्न करीत राहणार असून आम्हाला प्रेम दिले, कॉलेजला नाव दिले त्याबद्दल आभार मानतो.**

### स्वप्नवत इमारत अन् लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याप्रति कृतज्ञता

अत्यंत दुर्गम भागात असलेल्या या परिसरात विद्यार्थ्यांची तसेच शिक्षक आणि पालकांची मोठी गैरसोय होती. सोयीसुविधांपासून वंचित रहावे लागत होते. त्यामुळे प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना अडचण भासत होती. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या परिसराला आणि विद्यालयाला भेट दिली त्या वेळी त्यांनी येथील परिस्थिती बदलवून येथील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा निश्चय केला. तेवढ्यावर ते थांबले नाही ताबडतोब कार्यवाही केली आणि प्रत्यक्षात निश्चय पूर्ण करीत या परिसरातील विद्यार्थी, नागरिकांसाठी भव्य स्वरूपात इमारत साकारली. स्वप्नवत अशी वास्तू साकारल्याने विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ आणि रयतसेवकांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आभार व्यक्त करीत त्यांच्याप्रति आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली. (पान २ वर..)

## निवडक

### आंध्रनंतर तामिळनाडूत काँग्रेसला धक्का; युवा नेते केसवन भाजपत

**नवी दिल्ली :** आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे माजी नेते किरण कुमार रेड्डी यांच्यानंतर शनिवारी (दि. ८) तामिळनाडूमधील काँग्रेसचे युवा नेते आणि देशाचे पहिले गव्हर्नर जनरल सी. राजगोपालचारी यांचे पणतू सी. आर. केसवन यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. व्ही. के. सिंह, अनिल बलुनी आणि प्रेम शुक्ला यांच्या उपस्थितीत केसवन यांनी भाजपचे सदस्यत्व स्वीकारले.

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी घेतली 'सुखोई'मधून भरारी

**तेजपूर :** भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शनिवारी (दि. ८) आसामच्या तेजपूर एअरफोर्स स्टेशनवरून सुखोई ३० या लढाऊ विमानाने आकाशात उत्तुंग भरारी घेतली. हे विमान ग्रुप कॅप्टन नवीन कुमार यांनी चालवले. राष्ट्रपती या तिन्ही सैन्यदलांच्या प्रमुख असतात. अशी कामगिरी करणाऱ्या त्या दुसऱ्या महिला राष्ट्रपती ठरल्या आहेत.

## पनवेल विभागात आज स्वातंत्र्यवीर सावरकर गौरव यात्रा


**पनवेल : रामप्रहर वृत्त**



भाजप-शिवसेना युतीतर्फे रविवारी (दि. ९) पनवेल विभागात स्वातंत्र्यवीर सावरकर गौरव यात्रा काढण्यात येणार आहे. या यात्रेची जोरदार तयारी केली गेली आहे.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील कामगिरीचे स्मरण करून देण्यासाठी भाजप-शिवसेनेतर्फे राज्यभरात सावरकर गौरव यात्रा काढण्यात आल्या. पनवेल परिसरात ही यात्रा गौरवरथाचा सहभाग घेऊन रविवारी होणार आहे. खारघर येथून सायंकाळी ४ वाजता या गौरव यात्रेला सुरुवात होऊन कळंबोली, कामोठे, खांदा कॉलनी, नवीन पनवेल अशी फिरून पनवेल येथील स्वातंत्र्यवीर सावरकर चौकात पुष्पवृष्टी करून समारोप होईल.

सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास या उद्दिष्टाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश पुढे चालला आहे. आपल्या देशाचा गौरव जगभरात होत असताना काँग्रेस नेते राहुल गांधी मात्र परदेशात आपल्या देशाच्या विरोधात बोलतात. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी देशासाठी संघर्ष केला. दोन जन्मठेप, काळ्या पाण्याची शिक्षा, अंदमान येथे तुरुंगवास भोगला, संघर्ष केला. त्यांच्या जाज्वल देशभक्तीला कुणीच चॅलेंज करू शकत नाही, मात्र त्यांची देशभक्ती आणि कार्याविषयी विरोधकांकडून जाणीवपूर्वक संशय निर्माण केला जात आहे. तो हाणून पाडून महाराष्ट्राची व देशाची अस्मिता असणारे स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे महत्त्व अधिक वृद्धिंगत करण्यासाठी या गौरव यात्रेचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये संस्था, संघटना, सार्वजनिक उत्सव मंडळ, पत्रकार, नागरिकांनीही सहभागी व्हावे, असे आवाहन भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व सहकारी पदाधिकाऱ्यांनी केले आहे.



## राज्यात सलग दुसऱ्या दिवशी 'अवकाळी'

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील काही भागांत शनिवारी (दि. ८) सलग दुसऱ्या दिवशी वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. काही ठिकाणी गारपीटही झाली. या पावसामुळे पिकांचे नुकसान झाले आहे.

हवामान विभागाने मराठवाडा आणि विदर्भात ऑरेंज अलर्ट जारी केला होता तसेच तळकोकणात दोन दिवस अवकाळी पावसाचा अंदाज वर्तविला होता. त्यानुसार पाऊस पडला. यवतमाळ, बुलडाणा, अहमदनगर, हिंगोली, सांगली, सातारा आदी ठिकाणी जलधारा बरसल्या. या अस्मानी संकटामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. दरम्यान, प्रशासनाने पंचनामे सुरू केले आहेत. पंचनामे पूर्ण झाल्यानंतरच नुकसानीची निश्चित आकडेवारी समोर येणार आहे.



**गुवाहाटी :** आयपीएलमध्ये शनिवारी राजस्थान रॉयल्स आणि दिल्ली कॅपिटल्स या संघांमध्ये पहिल्या सत्रातील सामना झाला. या सामन्यात जोस बटलर व यशस्वी जैस्वाल यांच्या तडाखेबंद अर्धशतकांच्या जोरावर राजस्थानने बाजी मारली. राजस्थानने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकांत चार बाद १९९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात दिल्लीचा संघ नऊ बाद १४२ धावांपर्यंतच मजल मारू शकला.

# निवडक

## इलेक्ट्रिक बाइकच्या बॅटऱ्या चोरीस

**पनवेल :** इलेक्ट्रिक बाईक बनवणाच्या गोडावूनमधून बाइक बॅटरी चोरीला गेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी खान्देश्वर पोलीस ठाण्यात घरफोडीच्या गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जितेश चव्हाण ह्याचा इलेक्ट्रिक बाइक बनविण्याचा व्यवसाय आहे. बाइकसाठी लागणारे सुटे भाग ठेवण्यासाठी त्याने घरासमोर शेडचे छोटे गोडावून तयार केले आहे. या गोडावूनमधून बाइकची बॅटरी चोरीला गेली आहे. याविषयी खांदेश्वर पोलीस ठाण्यामध्ये घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पनवेलमध्ये घरफोडी; दागिने लंपास

**पनवेल :** घरातील दरवाजा उघडे पाहून घरात प्रवेश करून कपाटामध्ये ठेवलेले एक लाख ८० हजार रुपये किमतीच्या सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पनवेल महापालिका शेजारील लेक व्हीव विल्दीन इमारतीत राहणाऱ्या नाजिया वसीम फोपलुंकर यांच्या घरात कोणीतरी अज्ञात चोरट्याने घरातील दरवाजा उघडे असल्याचे पाहून घरात प्रवेश करून त्यांच्या बेडरूम मधील कपाटा खालील ड्रॉव्हरमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिन्यांपैकी एक लाख ३५ हजार रुपये किमतीचे तीन तोळे वजनाचे एक जोड सोन्याच्या बांगड्या तसेच ४५ हजार रुपये किमतीचे अंदाजे एक तोळे वजनांचे डायमंडचे नक्षीकाम असलेले दोन सोन्यांच्या अंगठ्या अज्ञात चोरट्याने चोरून नेले आहे. याप्रकरणी नाजिया फोपलुंकर यांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीची तक्रार दाखल केली आहे.



**रसायनी : रसायनी महिला ब्राह्मण संघाचा चैत्रगौर हळदी कुंकवाचा कार्यक्रम शुक्रवारी गणपती मंदिरात उत्साहात झाला. या वेळी २५ ते ३० महिलांची उपस्थिती होती. विष्णू सहस्त्रनाम, श्री सुक्त पठण झाले. सुषमा जोशी यांनी चैत्रगौरीची माहिती दिली. आंबेडाळ, चणे, खिरापत, पन्हे या सर्व चविष्ट खाद्यपदार्थांसह कार्यक्रम आटोपता घेतला. कार्यक्रमाचे नियोजन शिल्पा आपटे यांनी केले होते.** (छाया : बी. एस. कुलकर्णी)

# राहुलबाबा लोकशाहीची चिंता सोडा!

## ■ केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा टोला

**कौशांबी : वृत्तसंस्था**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर जोरदार टीका केली. राहुल बाबा लोकशाहीची चिंता सोडा, असा टोला अमित शाह यांनी लगावला. कौशंबी येथे आयोजित जाहीर सभेत बोलताना शाह यांनी भाजपाच्या जागा ३०० च्या पलिकडे घेऊन जाण्याचा मानस व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जनतेने टाकलेल्या विश्वासामुळेच हे घडणार असल्याचाही विश्वास त्यांनी व्यक्त केला. उत्तर प्रदेशातील कौशांबी येथील कडा धाम येथे कौशांबी महोत्सवाचे उद्घाटन करण्यासाठी गृहमंत्री उपस्थित होते.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि दोन्ही उपमुख्यमंत्री ब्रिजेश पाठक आणि केशव प्रसाद मौर्य यांनी गृहमंत्र्यांचे कौशांबी येथे आगमन झाल्यावर स्वागत केले. यानंतर गृहमंत्री माता शीतलाची पूजा करण्यासाठी कडा धाम येथे पोहोचले. येथून निघाल्यानंतर त्यांनी तीन दिवसीय कौशांबी महोत्सवाचे उद्घाटन केले.

यावेळी आयोजित जाहीर सभेला संबोधित करताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनविण्याबाबत उपस्थितांना आवाहन केलं.



केंद्रीय गृहमंत्री कौशांबी येथे पोहोचल्यावर सिरथू येथील सपा आमदार पल्लवी पटेल गोंधळ घालतील अशी शक्यता होती. याच पार्श्वभूमीवर पहाटे पोलीस आणि प्रशासनानं त्यांना त्यांच्या घरी नजरकैदेत ठेवलं होतं. या कार्यक्रमात सपा आमदार पल्लवी पटेल यांना आमंत्रित करण्यात आले नसल्याचे सांगण्यात येत आहे. तर स्थानिक आमदार म्हणून कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचा आपला हक्क असल्याचे त्यांचे म्हणणं होतं. याप्रकरणी संताप व्यक्त करत त्यांनी कार्यक्रमाला जाण्याची घोषणा केली होती.

समाजवादी पक्ष, बहुजन समाज पक्ष आणि काँग्रेसची सत्ता असताना आझमगढ हे दहशतवादी कारवायांसाठी ओळखले जात होते, अशी टीका अमित शहा यांनी भाषणामध्ये केली. गुजरातमधील एका मंदिरात दहशतवाद्यांनी बॉंबस्फोट घडवला होता, त्या दहशतवाद्यांचे संबंध आझमगढशी होते याची आठवण शहा यांनी यावेळी करून दिली.

### काँग्रेस नेत्यांना खुले आव्हान

**यावेळी गृहमंत्री अमित शहा यांनी उत्तर प्रदेशातील ६०० कोटींहून अधिक किमतीच्या ११७ प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. हे प्रकल्प कौशांबीच्या विकासाची नवी दिशा ठरवतील, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी काँग्रेस नेत्यांना खुलं आव्हान देत 'तुम्ही मैदान निश्चित करा, भाजपचे कार्यकर्ते देशात कुठेही लढायला तयार आहेत', असं म्हटलं. या वेळी त्यांनी गृहमंत्री राहुल गांधी यांना झालेली शिक्षा आणि त्यांना सभागृहातून काढून टाकण्यावरही भाष्य केलं. देशाच्या कायद्यावर त्यांचा विश्वास नाही, असे शाह सांगितले.**

# सकारात्मक विचार ठेवल्यास तणावमुक्ती मिळेल -राज्यपाल


## कैवल्यधाम योग संस्थेतर्फे कार्यालयीन योग कार्यशाळा

**मुंबई : प्रतिनिधी**

शरीर स्वस्थ, मन स्वस्थ आणि विचार सकारात्मक असल्यास तणावमुक्त जीवन जगता येईल व चेहऱ्यावर प्रसन्नता येईल. आज विद्यार्थ्यांपासून मोठ्यांपर्यंत लोक तणावपूर्ण जीवन जगत आहेत. अश्यावेळी आपल्या कार्यस्थळाच्या ठिकाणी थोडा वेळ काढून योग केल्यास तो उत्तम आरोग्य तसेच तणावमुक्तीच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे केले.

जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून शुक्रवारी (दि. ७) राजभवन येथे 'कैवल्यधाम' योग संस्थेतर्फे 'कार्यालयीन योग' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी राज्यपाल बोलत होते.

आरोग्य दिनानिमित्त हृदयविकाराच्या धक्क्याच्या वेळी रुग्णाला वाचविण्यासाठी वापरावयाचे इमर्जन्सी वैद्यकीय तंत्र (सीपीआर टेक्निक) या विषयावर देखील व्याख्यान व प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यालयाच्या ठिकाणी काही क्षण वेळ काढून योग करण्याची नव्याने रुजू होत असलेली संकल्पना जीवनशैली संबंधित आजारांकरिता चांगली असून योग म्हणजे केवळ शारीरिक आसने किंवा श्वसनाचे व्यायाम नसून योग ही निरामय जीवनासाठी



समग्र जीवनशैली असल्याचे राज्यपालांनी यावेळी सांगितले.

हृदयविकाराचा धक्का आल्यास किंवा श्वास थांबल्यास उपस्थित लोकांनी सीपीआर तंत्राचा वापर केल्यास रुग्णाला जीवनदान देता येते. हे तंत्र सोपे आहे. त्यामुळे सर्वांनी हे तंत्र शिकून घेतले पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले. यावेळी कैवल्यधाम संस्थेच्या वतीने योगशिक्षक रवी दीक्षित यांनी राजभवनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी योग कार्यशाळा घेतली. राज्यपालांसह सर्वांनी यावेळी योग केला.

**सीपीआर तंत्र**

**शिकवावे : डॉ. समीर पागड**

हृदयविकाराच्या धक्क्यामुळे एखाद्या व्यक्तीचा श्वास थांबल्यास त्याच्या छातीवर विशिष्ट पद्धतीने व वारंवारतेने दाब दिल्यास हृदयाचे पंपिंग सुधारून रुग्णाचा जीव वाचवता येते. हे तंत्र सोपे असून ते सर्व शाळा व महाविद्यालयात आवर्जून शिकविले पाहिजे, असे प्रतिपादन बॉम्बे हॉस्पिटल येथील हृदयविकार तज्ज्ञ डॉ. समीर पागड यांनी यावेली आयोजित सीपीआर तंत्र कार्यशाळेच्या वेळी केले.

या वेळी कैवल्यधामचे विश्वस्त डॉ दिनेश पंजवाणी व राजभवन येथील कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते.

# चोरट्याला वाचविण्यासाठी महिलांनी घातला धिंगाणा

**कल्याण : प्रतिनिधी**

घरात लपून बसलेल्या चोरट्याला पकडण्यासाठी पोलीस आले आहेत हे पाहून त्याला पोलिसांच्या अटकेपासून वाचविण्यासाठी घरातील तीन महिलांनी अंगावरील कपडे काढून पोलिसांसमोर आणि घरासमोरील रस्त्यावर धिंगाणा केल्याचा प्रकार शुक्रवारी घडला. कल्याण रेल्वे यार्ड ते कर्पेवाडी भागात ही घटना घडली.

सरकारी कामात अडथळा आणल्याची तक्रार कल्याण लोहमार्ग पोलिसांनी या महिलांच्या विरुध्द दाखल केली आहे. या प्रकाराने पादचारी, परिसरातील रहिवासी आश्चर्यचकित झाले होते. लोहमार्ग पोलीस, महिला पोलीस या महिलांना समजावून सांगत होते. तरीही त्या दाद देत नव्हत्या.

एका प्रवाशाचा मोबाईल कल्याण रेल्वे स्थानकातून लांबविण्यात आला होता. प्रवाशाकडून तक्रार दाखल झाल्यानंतर कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुकेश ढगे यांनी तपासाचे आदेश दिले होते. पोलिसांनी रेल्वे स्थानकावरील घटनास्थळाच्या भागातील सीसीटीव्ही चित्रण तपासले. त्यावेळी एक चोरटा प्रवाशाचा मोबाईल चोरत असल्याचे दिसून आले. पोलिसांनी त्या चोरट्याची ओळख पटवली. तो कल्याण येथील कर्पेवाडी भागातील असल्याची माहीती पोलिसांना मिळाली. त्या आधारे लोहमार्ग पोलिसांचे पथक शुक्रवारी त्या चोरट्याच्या घरी धडकले. तो घरात लपून बसला होता.

# कर्नाटकात काँग्रेसला उमेदवार मिळेना –मुख्यमंत्री बसवराज बोम्मई

**शिवमोगा : वृत्तसंस्था**

काँग्रेसला कर्नाटकात जवळपास ६० जागांवर योग्य उमेदवार मिळत नसल्याचा दावा भाजप नेते आणि राज्याचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी केला. पुढील महिन्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा दणदणीत पराभव होईल, त्यांना गेल्या वेळेपेक्षा कमी जागा मिळतील असे ते म्हणाले.

काँग्रेसकडे केवळ उमेदवारांची वानवा नाही तर त्यांना राज्यात काहीही स्थान नाही आणि त्यांच्याकडे राज्याच्या राजकारणाबद्दल कोणतीही स्पष्टता नाही अशी टीका बोम्मई यांनी केली.

काँग्रेसकडे स्वत:चे उमेदवार नसल्यामुळे ते इतर पक्षांमधून उमेदवार आयात करत आहेत असे बोम्मई म्हणाले. उमेदवारांची दुसरी यादी तयार करताना काँग्रेसचे डी. के. शिवकुमार आमच्या आमदारांना फोन करून निवडणूक लढवण्यासाठी विचारणा करत होते असा आरोप त्यांनी केला.

### कर्नाटकबाबत भाजपची आज दिल्लीत बैठक

**भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीची येथे ९ एप्रिल रोजी बैठक होणार आहे. यामध्ये कर्नाटक विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवार निश्चित केले जातील. या बैठकीला पंतप्रधान नरेंद्र मोदी, पक्षाध्यक्ष जे.पी.नड्डा, गृहमंत्री अमित शहा तसेच इतर नेते उपस्थित राहणार आहेत. कर्नाटकमधील भाजप नेत्यांनी उमेदवारी यादीला अंतिम स्वरूप दिले आहे. ही यादी केंद्रीय समितीपुढे ठेवली जाईल. भाजपचे कर्नाटक प्रभारी अरुण सिंह तसेच निवडणूक प्रभारी धर्मेंद्र प्रधान व राज्यातील अन्य नेत्यांच्या उपस्थितीत उमेदवारांची नावे ४ एप्रिलला निश्चित करण्यात आली.**

# प्रेयसीच्या पतीला धमकावणारा पोलीस उपनिरीक्षक निलंबित

**पुणे : प्रतिनिधी**

अनैतिक संबंधातून प्रेयसीच्या घरात शिरुन तिच्या पतीला शिवीगाळ तसेच पिस्तुलाचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षकाविरुद्ध कोथरुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अतिरिक्त पोलीस आयुक्त डॉ. जालिंद सुपेकर यांनी पोलीस उपनिरीक्षकास पोलीस दलातून निलंबित करण्याचे आदेश दिले.

या प्रकरणी प्रवीण नागेश जर्दे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपनिरीक्षक प्रवीण जर्दे यांच्याकडे न्यायालयीन आवार बंदोबस्ताची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. जर्दे पूर्वी कोथरुड पोलीस ठाण्यात नियुक्तीस होते. याबाबत एकाने कोथरुड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदाराच्या पत्नीचे उपनिरीक्षक जर्दे यांच्याशी अनैतिक संबंध होते. तक्रारदाराने पत्नीला अनैतिक संबंध तोडण्यास सांगितले होते. पत्नीने जर्देला या घटनेची माहिती दिली. त्यानंतर जर्दे तक्रारदाराच्या घरात शिरला. तक्रारदाराची आई आणि मुलांना शिवीगाळ केली. यापुढे पत्नीला काही बोलला तर गाठ माझ्याशी आहे, असे सांगून उपनिरीक्षक जर्दे यांनी त्यांच्याकडील कंबरलेला लावलेल्या पिस्तुलाला हात लावला.

तक्रारदारास जीवे मारण्याची धमकी दिली. घाबरलेल्या पतीने पोलिसांकडे तक्रार दिली. त्यानंतर या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला.

# तरुणांनी उद्योजक बनून देशाची अर्थव्यवस्था बळकट करावी



## ■ केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे प्रतिपादन
## ■ स्वयंरोजगार मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुरूड : प्रतिनिधी**

तरुणांनी केंद्र व राज्य शासनाच्या योजनांमधून लघू उद्योगांसाठी आर्थिक मदत घेऊन आपल्या भागात कारखाना अगर तत्सम उद्योग सुरू करून भागातील लोकांना रोजगार द्यावा आणि उद्योजक बनून देशाची आर्थिक व्यवस्था बळकट करावी, असे प्रतिपादन केंद्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे यांनी शनिवारी (दि. ८) लोणावळा येथे केले. ते स्वयंरोजगार मेळाव्यात बोलत होते.

महाराष्ट्रातील आदिवासी कोळी व मच्छीमार समाजातील युवक, युवती व महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याकरीता लोणावळा येथे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय, भारत सरकार तसेच कोळी महासंघ आणि भारतीय जनता पार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने स्वयंरोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. या स्वयंरोजगार मेळाव्याचे उद्घाटन भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते झाले. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे उपस्थित होते.

प्रास्ताविक कोळी महासंघाचे युवा प्रदेशाध्यक्ष ॲड. चेतन पाटील यांनी केले आणि एम.एस.एम.ई.च्या सर्व अधिकाऱ्यांनी उपस्थित सर्व बांधवांना योजनांची माहिती दिली.

यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आदिवासी कोळी व मच्छीमार समाजाचे प्रश्न आमदार रमेशदादा पाटील सभागृहात मांडून सरकारला या प्रश्नांची जाण करून देत असतात असे सांगून आमदार रमेशदादा पाटील यांचे अभिनंदन केले. तसेच मी ऊर्जामंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आमदार रमेशदादा पाटील यांच्या मागणीनुसार कोल्ड स्टोरेजचा व्यवसायिक दर्जा बदलून त्याला कृषीचा दर्जा देऊन कोल्ड स्टोरेजचा विजेचा दर कमी केला असल्याचे सांगितले.

त्याचप्रमाणे आदिवासी कोळी समाजाचा जातीच्या दाखल्याचा प्रश्न सोडवण्याकरीता सरकार प्रयत्नशील असून हा प्रश्न भाजपा सरकारच सोडणार असल्याचे आश्वासन यावेळी त्यांनी दिले.

याप्रसंगी बोलताना केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी, स्वयंरोजगार मेळावा आदिवासी कोळी व मच्छीमार समाजाने उद्योजक बनावे यासाठी आयोजित केला असल्याचे सांगून समाजाने आपली गरिबी नष्ट करण्याकरीता रमेशदादा पाटील यांच्या नेतृत्वात एकत्र येऊन आपली प्रगती करावी असे सांगितले.

कार्यक्रमाला भाजपा महामंत्री विक्रांत पाटील, कोळी महासंघाचे कार्याध्यक्ष प्रकाश बोबडी, सरचिटणीस राजहंस टपके, उपनेते देवानंद भोईर आदी उपस्थित होते.

### आदिवासी कोळी, मच्छीमार समाजाने उद्योजक बनावे

**आमदार रमेश पाटील यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करून सांगितले की, महाराष्ट्रातील आदिवासी कोळी व मच्छीमार समाजातील सुशिक्षित बेरोजगार युवक, युवती व महिलांना आत्मनिर्भर बनवणेकरीता कोळी महासंघ व भारतीय जनता पार्टी यांच्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली हा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. तसेच या मेळाव्यामध्ये विविध जिल्ह्यातील गाव खेड्यातून आलेल्या हजारो युवक, युवती व महिलांनी सहभाग घेतला असल्याचे सांगून आदिवासी कोळी व मच्छीमार समाजाने आता उद्योजक बनावे असे सर्व समाज बांधवांना आवाहन करून केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी कोकण किनारपट्टीवरील मच्छीमार बांधवांचे डिझेलचे दर कमी केल्याबद्दल कोळी महासंघाच्यावतीने त्यांचे आभार मानले.**

पान १ वरून

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे दातृत्व 'रयत'च्या पाठीशी

कमालीची लोकप्रियता असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांची राजकारणीपेक्षा समाजकारणी म्हणून समाजात प्रतिमा आहे. दानशूर व्यक्तिमत्व म्हणून त्यांना ओळखले जाते. त्यांना राजकारणापेक्षा समाजकारणात विशेष रूची आहे. त्यामुळे सामाजिक बांधिलकी हे तत्व त्यांनी सुरुवातीपासून अंगीकारले आहे. दररोज हजारो लोक त्यांना भेटण्याकरिता येतात. त्यामध्ये अडचणींची सोडवणूक करण्याबरोबरच मदतीच्या अपेक्षेने अनेक जण येतात. आणि त्यांच्याकडे आलेली व्यक्ती रिकाम्या हाताने परत कधीच जात नाही. अनेकांचे अश्रू पुसण्याचे काम ते करतात. जिद्द, चिकाटी, प्रामाणिकपणा, कठोर परिश्रमघेण्याची तयारी या गुणांचे बाळकडू त्यांना लहान वयातच आई–बाबांकडून मिळाले होते. त्यामुळे जीवनातील संघर्षाला तोंड देत असताना आपल्या अंतरमनात शिक्षणाविषयीची आस त्यांनी जागृत ठेवली. रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील विद्यालयात त्यांनी कमवा आणि शिका या तत्त्वाने आपले शिक्षण पूर्ण केले. त्यांनी शिक्षणाची जाण ठेवत रयत संस्थेच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने मदतीचा हात देऊ केला आहे. आज त्यांच्या कार्याचा गौरव सर्वत्र होत असून रयत शिक्षण संस्थेनेही त्यांचे नाव अनेक विद्यालयांना देऊन त्यांच्या कार्याची पावतीच दिली आहे. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था ही त्यांची स्वतः ची शिक्षण संस्था आहे, मात्र तरीही त्यांनी या संस्थेपेक्षा रयत शिक्षण संस्थेच्या विकासाला अधिक महत्त्व दिले आणि रयत शिक्षण संस्थेला कायम मातृसंस्था मानून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची वाटचाल सुरू आहे. रयत शिक्षणाच्या विकासासाठी हाक दिल्यानंतर प्रत्येकवेळी त्या हाकेला प्रतिसाद देऊन रयत शिक्षणाच्या विकासात लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे योगदान समाजाला आदर्श देणारे आहे. केवळ समाजासाठी जगणारे लोकमान्य लोकनेता म्हणून त्यांची संपूर्ण महाराष्ट्रात ओळख असून सामाजिक बांधिलकी, दूरदृष्टी, सकारात्मक विचारसरणी, प्रामाणिकपणा, अचूक निर्णय क्षमता, कर्तव्यनिष्ठा, श्रद्धा या गुणांमुळे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याची महती देशभरात आहे. रयतेच्या स्वप्नांचे शिल्पकार ठरलेले कर्मवीर अण्णा यांचा आदेश डोळ्यासमोर ठेवून आपले शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील काम सुरू ठेवले. रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य व रायगड विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी मिळाली त्या जबाबदारीचे कर्तव्य भावनेत रूपांतर करून त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल, नवी मुंबई व रायगड आणि राज्यातील इतर अनेक शाखा सोयीसुविधायुक्त करण्यासाठी पुढाकार घेतला. आपल्या सेवाभावी वृत्तीचे सदोदित दर्शन घडवत रयतेचे शैक्षणिक काम म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचाराचे काम असे समजून सदैव त्यात झोकून देऊन शैक्षणिक प्रगतीची दारे त्यांनी सर्वांना खुली केली. त्यांच्या अफाट कार्याची दखल घेत सातारा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयात लोकनेते रामशेठ ठाकूर भवन लोकार्पित झाले आहे आणि भावी पिढीसाठी ही आदर्श वास्तू प्रेरणादायी ठरत आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, औद्योगिक इतिहासात ज्या थोर व महनीय व्यक्तींनी आपल्या कर्तृत्वाने नवी दिशा दिली. त्या व्यक्तीमध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव फार महत्त्वाचे आहे. रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य असणारे लोकनेते रामशेठ ठाकूर हे रयत शिक्षण संस्थेच्या लहान मोठ्या शाखांचे व रयत सेवकांचे आदर्श आहेत. एकूणच महाराष्ट्राच्या समाजकारणाचा व राजकारणाचा विचार केला तर महाराष्ट्रामध्ये लोकनेते या पदाला पोहचलेल्या हाताच्या बोटावर मोजण्याएवढ्याच व्यक्ती आहेत त्यामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आदराने नाव घेतले जाते. महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कृतिशील विचारांचा समृद्ध वारसा पुढे चालवित आहेत. त्यांच्यातील दातृत्व या असामान्य गुणामुळे संपूर्ण महाराष्ट्राच्या जीवनात आदरयुक्त स्थान आहे. साधी राहणी आणि उच्च विचार हे त्यांनी अंगिकारलेले तत्त्व सर्वांना प्रेरणादायी ठरत आहेत. रयत शिक्षण संस्था फक्त शिक्षण संस्था नाही, तर आपले कुटुंब आहे, हा विचार अंगीकारून स्वतःला त्यात झोकून देण्याचे काम अखंडपणे सुरू आहे. त्यांच्याप्रती असलेला आदरभाव लक्षात घेता मोखाड्यात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नावाने महाविद्यालय उभारण्याचा निर्णय घेत रयत शिक्षण संस्थेने घेतला.

# स्वा. सावरकरांच्या जीवनावर आधारित चित्रप्रदर्शनी

## गौरव यात्रेनिमित्त पनवेलमध्ये उपक्रम; विचारांचा जागर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जगाचे नेतृत्व करण्यासाठी सक्षम नवीन पिढी तयार करायची असेल तर तरुणांनी सावरकरांचे तेजस्वी विचार आत्मसात करायल हवे. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या ह्या विचारांचा जागर करण्यासाठी पनवेल शहरात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनावर आधारीत 'चित्रप्रदर्शनी' भरवण्यात आली आहे. या प्रदर्शनीचे उद्घाटन भाजपचे माजी नगरसेवक नितीन पाटील आणि शिवसेनेचे माजी नगरसेवक अ‍ॅड. प्रथमेश सोमण यांच्या हस्ते शनिवारी (दि. ८) झाले.



(छाया : विकास म्हात्रे)



स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील कामगिरीचे स्मरण करून देण्यासाठी राज्यभरात भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेतर्फे सावरकर गौरव यात्रा काढण्यात येत आहे. त्याअंतर्गत रविवारी ही गौरव यात्रा पनवेल महापालिका क्षेत्रात होणार आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष, शिवसेना व सर्व समविचारी पक्ष आणि संघटनांच्या माध्यमातून पनवेल शहरातील सावरकर चौकात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनावर आधारित चित्रप्रदर्शनी भरवण्यात आली आहे.

या प्रदर्शनीचे उद्घाटन भाजपचे माजी नगरसेवक नितीन पाटील आणि शिवसेनेचे माजी नगरसेवक अ‍ॅड. प्रथमेश सोमण यांच्या हस्ते झाले. या वेळी भाजप ओबीसी सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, माजी नगरसेविका रूचिता लोंढे, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, युवा मोर्चाचे पनवेल शहर अध्यक्ष रोहित जगताप, प्रसाद खंदारे, अभिजित साखरे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.





**खारघर : सेक्टर १५ प्रभाग क्रमांक ६ घरकुल-स्पॅगिटी संकुल तलावाचे पनवेल महापालिकेच्या माध्यमातून सुशोभीकरण करण्यात येत आहे. या कामाची पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी नुकतीच पाहणी केली. या वेळी माजी नगरसेवक निलेश बाविस्कर, अभिमन्यू पाटील, भाजप नेते वासुदेव पाटील, सोशल मीडिया शहर सहसंयोजिका कांचन बिर्ला, प्रिया राजकुमार नटराजन, दुर्गामाता फेरीवाला संस्थेचे सदस्या प्रतीक्षा माळी, आशा मोरे, छाया हरेल, सुनंदा मोरे, दिपाली गायकवाड, गुरव ताई आदी उपस्थित होते.** (छाया : अक्षय शार्दुल)



**पनवेल : सावळे ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची निवडणूक नुकतीच झाली. या निवडणुकीत भाजपचे सुनील माळी हे सरपंचपदी बिनविरोध विजयी झाले. त्याबद्दल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सुनील माळी यांची शुक्रवारी सदिच्छा भेट घेत त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. या वेळी सदाशिव माळी, शिवाजी माळी, निलेश माळी, राजेश कांबळे, रोशन पाटील, कमलाकर माळी, भूषण माळी, ओमकार माळी आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

# कर्नाळा खिंडीत टँकर उलटला

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर पनवेलजवळील कर्नाळा खिंडीत अचानक टँकर उलटल्याने महामार्ग काही काळ ठप्प झाला होता. या घटनेत टँकरचालक किरकोळ जखमी झाला असून पनवेल तालुका पोलीस आणि पळस्पे वाहतूक शाखेच्या पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत महामार्गावरील वाहतूक सुरळीत केली.

कर्नाळा खिंडीत टँकरचालक अनुराग रामजी यादव यांचे टँकरवरील नियंत्रण सुटल्याने डाव्या बाजूला उलटला. या घटनेत टँकरचालक किरकोळ जखमी झाला आहे. घटनेची माहिती मिळताच तालुका पोलीस आणि पळस्पे वाहतूक शाखेच्या पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत महामार्गावरील वाहतूक सुरळीत केली. तसेच आपत्कालीन मोबाईल अ‍ॅम्ब्युलन्स तत्काळ दाखल होत टँकरचालकाला प्राथमिक उपचार करत त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. या अपघातामुळे काही काळ वाहतूक कोंडी झाली होती.



# अ‍ॅड. मनोज भुजबळ यांच्या वाढदिवसानिमित्त आधार कार्ड शिबिर



(छाया : योगेश पाटील)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष, पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा झाला. त्यांच्या माध्यमातून वाढदिवसाचे औचित्यसाधून



नवीन पनवेल येथील भागीरथी सदन या जनसंपर्क कार्यालयात आधार कार्ड शिबिराचे ७ आणि ८ एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात आधार नोंदणी, आधार कार्ड अपडेट करण्यात आले. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांचे सर्वसामान्यांना मदत करण्याचे ध्येय्य समोर ठेवून अ‍ॅड. मनोज भुजबळ यांनी हा उपक्रम राबवला. या शिबिराला नागरिकांना उदंड प्रतिसाद लाभला असून शिबिराचे आयोजन केल्याबद्दल नागरिकांनी अ‍ॅड. मनोज भुजबळ यांचे आभार मानले.

दरम्यान, भारतीय जनता पक्ष हा जनसेवेसाठी सदैव झटणारा पक्ष असल्याचे प्रतिपादन माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ आधार कार्ड शिबिरावेळी केले.

# श्री रामेश्वर महाराज आदिवासी संस्थेतर्फे आरोग्य शिबिर






**पनवेल : वार्ताहर**

श्री रामेश्वर महाराज आदिवासी संस्थेतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही आरोग्य शिबिर करंजाडी व कुंभाडा येथे संस्थेचे अध्यक्ष रामेश्वर महाराज नरे यांच्या अध्यक्षतेखाली हे शिबिर झाले.

या वेळी प्रमुख पाहुण म्हणून डॉ. संतोष मारूती शिंदे, आरोग्य केंद्र विन्हेरे वरिष्ठ लिपिक बबन पगारे तसेच करंजाडी ग्रामपंचायत ग्रामसेवक अनिल ताकपेरे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शंकुतला यरमाळे यांनी केले. या वेळी राजु पवार, बाळ्या पवार, ग्रामपंचायत सदस्य ताराबाई वाघमारे तसेच आदिवासी बांधव व भगिनी उपस्थित होत्या.

या वेळी मार्गदर्शन करताना रामेश्वर महाराज म्हणाले की, आदिवासी समाजाने उच्च शिक्षण घ्यावे, आपले आरोग्य उत्तम ठेवावे, साफ सफाई ठेवावी, लहान वयात लग्न करू नये, स्वावलंबी बनवून स्वतःचा व्यवसाय करावा व शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, त्यासाठी रामेश्वर महाराज आदिवासी संस्था योग्य ती मदत करण्यास व रामेश्वर महाराज योग्य ती दखल घेवून शासन दरबारी आदिवासी समाजाला न्याय मिळविण्याकामी योग्य ती मदत करतील याची ग्वाही रामेश्वर महाराज यांनी दिली.




**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत वैकुंठवासी ह.भ.प अप्पा माऊली यांच्या कृपाशीर्वादाने गव्हाण येथील शांतादेवी मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे या सप्ताहाचे अठरावे वर्ष असून ४ ते ११ एप्रिलदरम्यान या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सप्ताहामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम सुरू आहेत. शुक्रवारी सदगुरु कृपांकित हभप जयेश महाराज भाग्यवंत यांचे कीर्तन झाले. या वेळी ग्रामस्थ उपस्थित होते.** (छाया : प्रफुल्ल कांबळे)

# आमदार महेंद्र थोरवेंच्या वाढदिवसानिमित्त उरण तालुक्यात विविध सामाजिक उपक्रम

**उरण : बातमीदार**

कर्जत-खालापूर मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांचा वाढदिवस कर्जत, खालापूर आणि उरण तालुक्यात शुक्रवारी (दि. ७) मोठ्या उत्साहात साजरा केला गेला. उरण तालुक्यात त्या निमित्ताने विविध सामाजिक उपक्रम राबविले गेले.

राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य तथा शिवसेना उरण विधानसभा संपर्कप्रमुख रूपेश पाटील यांनी उरणमधील रानसई कातकरी वाडी येथे आदिवासी बालकांसाठी शालेपयोगी साहित्य आणि खाउचे वाटप केले. तसेच दैनंदिन गरजेसाठी आधार कार्ड नोंदणी पॅनकार्ड तसेच रेशन कार्डची सध्याची असलेली गरज व त्या नोंदणीसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे याची माहिती बाबत जनजागृती करून नोंदणी केली. असे विविध सामाजिक कार्यक्रम उरण तालुक्यात आयोजित केले गेले. शिवसेना शाखा, जसखार तालुका उरण यांच्या उत्साही सहभागाने कार्यक्रम झाला.

कार्यक्रम रूपेश पाटील ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या वेळी उरण तालुक्यातील शिवसेनेचे पदाधिकारी विभागप्रमुख गणेश घरत, शाखाप्रमुख अमित ठाकूर, ग्रामपंचायत जसखार उपसरपंच प्रणाली किशोर म्हात्रे, सदस्या हेमलता भालचंद्र ठाकुर, सूर्यकांत ठाकूर, नितीन पाटील, हर्षल ठाकूर, तेजस घरत आदी शिवसैनिक उपस्थित होते तसेच माजी उपसरपंच महेश कातकरी, सुनील जोशी, नामदेव ठाकूर हे सामाजिक कार्यकर्ते आणि विंधणे ग्रामपंचायतीच्या महिला सदस्य उपस्थित होत्या.



# रोटरी क्लबमध्ये 'झिम्मा मैत्रीचा' सादर




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सिंफनीमध्ये झिम्मा मैत्रीचा या एकांकिकेचा प्रयोग आयोजित करण्यात आला. ब्राह्मण सभा, नवीन पनवेल या संस्थेच्या सखी समुहाने या एकांकिकेची निर्मिती केली आहे. संकल्पना व दिग्दर्शन वैशाली केतकर यांचे आहे.

प्रसिद्ध लेखिका निलिमा देशपांडे यांचे लेखन असून त्यांनी या एकांकिकेत तीन पिढ्यांचे नातेसंबंध अतिशय समर्पकपणे गुंफलेले आहेत. प्रत्येक पिढीचा काळ बदलत असला व विचारसरणी विविध प्रकारची असली तरीही कुटुंबसंस्था चिरंतन राहण्यासाठी संस्कारक्षम विचार देण्याचे आव्हान या एकांकिकेच्या माध्यमातून लेखिका निलिमा देशपांडे यांनी सहज पेलले आहे असे दिसून आले. सर्व कलाकारांनीही आपापल्या भूमिकेला न्याय देत उत्तम सादरीकरण केले. मानसी जोशी यानी नेपथ्य व मीरा परसोडकर यांनी तांत्रिक सहाय्य केले.

**रोटरी क्लब ही संस्था सदैव सामाजिक कार्यासाठी अग्रेसर संस्था आहे. त्याचबरोबर सुदृढ समाजजीवन टिकून राहण्यासाठी अशा प्रकारचे संस्कारक्षम उपक्रमही राबवत आहे.**

**-श्रीपाद वैशंपायन, अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ पनवेल सिंफनी**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सिंफनीचे अध्यक्ष श्रीपाद वैशंपायन, सचिव विनया वाळिंबे, खजिनदार संजय गोवेकर यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

# अक्कादेवी येथील आदिवासी शाळेत साहित्याचे वाटप

**उरण : वार्ताहर**

चिरनेर अक्कादेवी येथील आदिवासी शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य आणि खाऊचे वाटप करण्यात आले.

चिरनेर येथील तिरंगा पतसंस्थेच्या सभासदाच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसांना तिरंगा पतसंस्थेकडून दहा हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात येते. तिरंगा पतसंस्थेच्या या आर्थिक सहाय्य करण्याच्या निर्णयानुसार, तिरंगा पतसंस्थेचे सभासद तथा ज्येष्ठ रंगकर्मी दत्तात्रेय चांगा खारपाटील यांचे वृद्धपकाळाने निधन झाल्यामुळे त्यांच्या वारसांना तिरंगा पतसंस्थेच्या वतीने रोख दहा हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली, मात्र मयत दत्तात्रेय खारपाटील यांचे पुत्र अ‍ॅड. सुबोध खारपाटील आणि डॉ. किरण खारपाटील यांना पतसंस्थेकडून मिळालेली ही दहा हजार रुपयांची आर्थिक मदत त्यांनी एखाद्या चांगल्या कामासाठी देण्याचा निर्णय घेतला. आणि त्यानुसार या १० हजार रुपयांच्या निधीतून शनिवारी (दि. ८) चिरनेर अक्कादेवी येथील आदिवासी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय पिटीचे गणवेश तसेच कंपास, पेन,




पेन्सिल, रबर, टिफिन बॉक्स अशा शालेय साहित्याचे वाटप आणि खाऊचे देखील वाटप करण्यात आले.

या वेळी चिरनेर गाव तंटामुक्तीचे अध्यक्ष अलंकार परदेशी, सामाजिक कार्यकर्ते श्रीधर मोकल, निवृत्त शिक्षिका शारदा खारपाटील, पत्रकार मिलिंद खारपाटील, शाळेचे शिक्षक सनी बोरसे, डॉ. किरण खारपाटील, अ‍ॅड. सुबोध खारपाटील, सुचिता खारपाटील तसेच खारपाटील परीवारातील अन्य सदस्य या वेळी उपस्थित होते.

# सलिम दुराणी मैदानावरचा प्रिन्स, पडद्यावर त्रिफळाचीत

**सोशल मिडियाच्या आजच्या ग्लोबल युगात सकाळीच कोणती 'आज की ताजा खबर' समजेल हे काहीच सांगता येत नाही आणि याचीच व्हॉटसअॅपवर नजर टाकताना मनात धडकी भरते...२ एप्रिल २०२३ ची सकाळ अशीच दु:खद, निराशाजनक बातमीने झाली, सकाळीच साडेचार वाजता गुजरातमधील भावनगर येथे क्रिकेटपटू सलिम दुराणी याचे वयाच्या ८८व्या वर्षी कर्करोगाने निधन झाले.**



झूम प्रहर



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

बातमी समजातच एकाच वेळेस डोळ्यासमोर अनेक गोष्टी आल्या. स्वतःचं रुबाबदार, देखणे, लालसर गुलाबी उंच धिप्पाड व्यक्तिमत्व असलेला आणि डावखुरा असलेल्या चौकार अथवा षटकारांत शैलीदारपणा असलेला अष्टपैलू क्रिकेटपटू जगाच्या मैदानावरुन आऊट झाला. कोणी त्याला 'राजपुत्र' म्हणत. अफगाणिस्तानातील काबूल येथे जन्मलेला सलिम फाळणीनंतर आ साठ आणि सत्तरच्या दशकात कसोटी क्रिकेटमध्ये षटकार ही अतिशय दुर्मिळ गोष्ट होती. तो काळ जमिनीलगत फटके मारत खेळपट्टीवर नांगर टाकून दिवसभर टिच्चून खेळण्याचा. सलिम दुराणी हा पुस्तकी फटके मारणारा अथवा चाकोरीबद्ध फलंदाजी करणारा नव्हता. जबाबदार तेवढाच बेदरकार असा असल्याने सिक्सर मारल्यावर तो मोकळाढाकळा




होई आणि असा रांगडा क्रिकेटर स्टेडियमवरील खचाखच भरलेल्या क्रिकेट रसिकांना आवडे. त्यातूनच 'व्ही वॉन्टस सिक्सर'चा नारा जन्माला आला आणि स्टेडियमभर घुमू लागला. आणि सलिम दुराणीने हुकमी सिक्स मारली की ती त्याच हेडिंगने चौकटीतील बातमी असे. तीच सलिम दुराणीची ओळख झाली. इमेज झाली. त्या काळात आजच्यासारखं क्रिकेटचे बाराही महिने पीक येत नसे. सलिम दुराणी गुजरात, सौराष्ट्र आणि राजस्थान या संघातून खेळला. एकाच संघात स्थिर नव्हता, पण खेळात स्थिरता होती. त्या काळात रणजी करंडक, दुलीप करंडक, कांगा क्रिकेट आणि कसोटी क्रिकेट एवढेच असल्याने क्रिकेटचे आकर्षण कायम असे, क्रिकेटर फ्रेश राहत आणि आपले खाजगी तसेच नोकरी वगैरेचे आयुष्य जगत. सलिम दुराणीचा कसोटी क्रिकेटमधील धावफलक म्हणूनच फार मोठ्या आकडेवारीचा नाही. खरं तर तो आकड्यात मोजावा अथवा बसावा असा क्रिकेटर नाहीच. हे त्याचे मोठेच यश. कसोटीत १२०२ धावा, त्यात १९६२ साली वेस्ट इंडिजविरुद्धचे एकमेव शतक आणि ७५ बळी. तो वेगाने फिरकी गोलंदाजी करे. त्यातील दोन विकेट्स गाजल्या. १९७१ सालच्या पोर्ट ऑफ स्पेनच्या मैदानावरील कसोटीत सलिम दुराणीने कर्णधार अजित वाडेकर यांच्याकडून गोलंदाजी मागून घेतली आणि लागोपाठच्या चेंडूवर त्याने क्लाईव्ह लॉईड आणि कर्णधार गारफिल्ड सोबर्स (चक्क शून्यात) यांना बाद केले आणि सामना असा काही फिरला की तो सामना आणि मालिकाच आपण जिंकलो. १९७२-७३ साली टोनी लुईसच्या नेतृत्वाखालील इंग्लंडचा संघ पाच कसोटी सामन्यांसाठी भारतात आला असता मुंबईतील पाचव्या कसोटीतही त्याला चौथ्या कानपूर कसोटीप्रमाणेच वगळणार अशी बातमी पसरल्याने दक्षिण मुंबईत 'नो सलिम दुराणी नो क्रिकेट' असे चक्क फलक लागले. त्याला या सामन्यात संधी मिळाली. त्याने पहिल्या डावात ७३ तर दुसऱ्या डावात ३७ धावा काढल्या. (मुंबई दूरदर्शनवर दाखवला गेलेला हा पहिला कसोटी सामना. माझ्या पिढीची ही एक छान आठवण.) हा त्याचा शेवटचा कसोटी सामना ठरला तरी आणखीन काही वर्षे तो प्रथम दर्जाचे क्रिकेट खेळत होता. मुंबईत तो गिरगावातील कल्याण बिल्डिंगमध्ये काही वर्षे राहिल्याचे जुने गिरगावकर सांगतात; अन्यथा मुंबईत त्याचा मुक्काम मशीद बंदरला असे.

क्रिकेटच्या मैदानाभरची अशी मनसोक्त फटकेबाजी आणि सिनेमाच्या पडद्याभरची अदाकारी यात प्रचंड फरक आहे आणि हे अनेक क्रिकेटर हीरोगिरीच्या क्षेत्रात आल्यावर दिसून आले, पण चित्रपटरसिकांनी ते चित्रपट नाही पाहिले. त्याची फक्त नोंद झाली. काही आठवणीत राहिले, तर काही खुद्द क्रिकेटर्सना 'सिनेमाच्या कॅमेऱ्या'ची आठवण नकोशी असेल. त्यात 'मैदान मारता येत नाही.

सलिम दुराणी उंच, धिप्पाड, देखणा, त्यामुळे 'आपण हीरोगिरी' करू शकतो असा त्याला आणि फिल्मवाल्यांनाही विश्वास वाटणे स्वाभाविक आहे आणि त्याची अष्टपैलू क्रिकेटपटूची लोकप्रियता बॉक्स ऑफिसवर कॅश होऊ शकते असे व्यावहारिकदृष्ट्या निर्माता आणि दिग्दर्शकाला वाटूही शकते. सिनेमाच्या जगात असे सतत कोणाला ना कोणाला काहीतरी वाटतच हे क्षेत्र भारी विस्तारलेय. वर्षानुवर्ष चौफेर वाटचाल करते. त्याबद्दल काही बोलायचे नसते इतकेच. आपण फक्त 'खेळी' पाह्यच्या, आवडल्या तर मनात ठेवायच्या अन्यथा विसरायच्या.

'अवघ्या काही दिवसांच्या शूटिंग सत्रात... धाडसी थीमवर चित्रपट घडवणारे सत्तरच्या दशकातील बहुचर्चित दिग्दर्शक बी. आर. इशारा यांनी सलिम दुराणीला आपल्या 'चरित्र' (१९७३) या चित्रपटाच्या हीरोगिरीसाठी साईन केला तेव्हा भारतात टोनी लुईसच्या नेतृत्वाखाली इंग्लडच्या क्रिकेट संघाविरुध्द सामने रंगात आले होते. सलिम दुराणी हमखास सिक्सर मारत 'पब्लिक स्टँड'चा हीरो झाला होता, अशातच तो सिनेमात हीरो म्हणजे ब्रेकिंग न्यूजच. बरं त्याची नायिका कोण? तर नवतारका परवीन बाबी. (या पिक्चरच्या जाहिरातीत तिला नवयौवना म्हटलं) जी पडद्यावर दिसण्यापूर्वी गॉसिप्स मॅगझिनच्या ग्लॉसी पेपरवर आपल्या सेक्स अपिलच्या फोटो सेशनमधून जास्त चमकत होती. 'फोकस'मध्ये होती. हिंदी चित्रपटाची नायिका थोडी जास्तच मॉडर्न होण्याचा तो काळ होता आणि परवीन बाबी त्यात एकदम फिट होती. तिची मूळ पर्सनालीटीच तशी होती. 'चरित्र'चा दुसरा नायक गौतम सरीन आहे. त्यासह मनमोहन कृष्ण, असित सेन, दिलीप दत्त, जॉनी व्हीस्की, सी. एस. दुबे इत्यादींच्या भूमिका आहेत.

'चेतना' (१९७०)च्या वादळी चर्चेमुळे दिग्दर्शक बी. आर. इशारा यांच्या चित्रपटात काही 'धाडसी थीम आणि दृश्ये' नक्कीच पाह्यला मिळणार असा केवढा तरी समज निर्माण झालेला, 'चरित्र'चे मध्यवर्ती सूत्र असे, एक युवती जिला सज्जन समजते तो दुर्जन ठरतो आणि ज्याला गुणवान समजते तो दुष्ट निघतो. समज गैरसमजाचा खेळ सारा.

अशातच 'चरित्र' रिलीज झाला (मुंबईत मेन थिएटर न्यू एम्पायर), समिक्षकांनी झोडपला आणि पहिल्याच खेळापासून त्याकडे प्रेक्षकांनी पूर्णपणे आणि असे काही दुर्लक्ष केले की, मोजून एकमेव



आठवड्यात या चित्रपटाची रिळे गोडावूनमध्ये जमा झाली ती कायमचीच! यू ट्यूबवर 'चरित्र' आहे इतकेच.

सलिम दुराणीचा फिल्मी खेळपट्टीवर फस्ट डे फर्स्ट शोलाच त्रिफळा उडाल्यावर तो पुन्हा कधीच याकडे वळला नाही आणि अशा फ्लॉप हीरोला कसे हो कोण साईन करेल? तरी त्याला 'चरित्र' रिलीजपूर्वी दोन पिक्चर मिळाले, देव आनंदने चक्क विचारले (हीरो अर्थातच देव आनंद.) अशा बातम्या होत्या, पण पडद्यावर पहिल्याच चेंडूवर बाद झालेल्याकडे पाह्यला कोणाला रस आहे? सलिम दुराणीचा पहिलाच चित्रपट शेवटचा ठरला. देखणं रुपडं असूनही तो हीरो म्हणून गाजला नाही. परवीन बाबीला मात्र हा नियम लागू झाला नाही. कारण, आपला हा पहिला चित्रपट रिलीज होण्यापूर्वीच तिने 'धुंए की लकीर', 'छत्तीस घंटे' इत्यादी चित्रपटात भूमिका साकारत आपले करियरचे चरित्र आकाराला आणले... सलिम दुराणी आठवला की, त्याचे 'वी वॉन्ट सिक्सर्स'चे 'चरित्र' आठवते. तिच त्याला श्रद्धांजली.



---






# उगवत्या ताऱ्यांची आयपीएल!

**आयपीएल अर्थात इंडियन प्रीमियर लीगचे १६वे पर्व रंगू लागले आहे. उदयोन्मुख क्रिकेटपटूंसाठी ही स्पर्धा एक जबरदस्त व्यासपीठ मानले जाते. यंदा अनेक बडे खेळाडू दुखापतग्रस्त असल्याने युवा खेळाडूंना मोठी संधी प्राप्त झाली आहे.**

अतिक्रिकेटमध्येही आयपीएलची लोकप्रियता टिकून आहे. ट्वेन्टी-२०चे झटपट फॉरमॅट, देशी-विदेशी खेळाडूंचा सहभाग, आयोजनाला दिलेली कल्पकतेची जोड, उद्घाटन व पारितोषिक वितरण समारंभात ग्लॅमरचा तडका, सामन्यांमध्ये अधिक रंगत आणण्यासाठी नियमांमध्ये वेळोवेळी केले जाणारे बदल यामुळे आजही आयपीएलचे सामने मोठ्या प्रमाणावर पाहिले जातात. रिलायन्स जिओ कंपनीकडून यंदा या सामन्यांचे विनाशुल्क थेट प्रक्षेपण केले जात असल्याने विविध माध्यमांतून सहजपणे ते पाहता येत आहेत. अर्थात, या 'मोफत'मध्येही त्यांचा व्यावसायिक दृष्टिकोन असला तरी सामने मोबाईलद्वारेदेखील अगदी कुठेही पाहणे शक्य होत असल्याने क्रिकेटप्रेमींना ही पर्वणीच आहे.

या वर्षी अनेक स्टार क्रिकेटपटू दुखापतीमुळे आयपीएलमध्ये खेळताना दिसत नाहीत. यामध्ये भारताचा अव्वल गोलंदाज जसप्रीत बुमराह (मुंबई इंडियन्स), यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंत (दिल्ली कॅपिटल्स), श्रेयस अय्यर (कोलकाता नाईट रायडर्स), प्रसिद्ध कृष्णा (राजस्थान रॉयल्स), मुकेश चौधरी (चेन्नई सुपरकिंग्ज), अंगद बावा (पंजाब किंग्ज), मोहसीन खान (लखनऊ सुपरजायंट्स); तर परदेशातील इंग्लंडचा जॉनी बेअरस्टो (पंजाब किंग्ज) व विल जॅक, रीज टॉपली, ऑस्ट्रेलियाचा जोश हेझलवूड (रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू), ऑस्ट्रेलियाचा झाय रिचर्डसन (मुंबई इंडियन्स), न्यूझीलंडचा काइल जेम्सन (चेन्नई सुपर किंग्ज) व लोकी फर्ग्युसन (कोलकाता नाईट रायडर्स) यांसारख्या खेळाडूंचा समावेश आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि चेन्नई सुपर किंग्स हे क्रिकेटपटूंच्या दुखापतीने सर्वाधिक प्रभावित झालेले संघ आहेत. दिल्ली कॅपिटल्स आणि कोलकाता नाईट रायडर्स या संघांना त्यांचे कर्णधारच बदलावे लागले. दिल्लीचा कर्णधार ऋषभ पंत कार अपघातात जखमी झाल्याने या मोसमातून बाहेर झाला. त्याचबरोबर कोलकाताचा कर्णधार श्रेयस अय्यर पाठीच्या दुखण्याने बेजार असल्याने स्पर्धेबाहेर गेला. सनरायझर्स हैदराबाद असा एकमेव संघ आहे की त्यांचा एकही खेळाडू अद्याप दुखापतग्रस्त झालेला नाही.

आयपीएलच्या सोळाव्या हंगामाला लागलेले खेळाडूंच्या दुखापतीचे ग्रहण सुटण्याचे नाव घेत नाही. यंदाच्या पहिल्याच सामन्यात गुजरात टायटन्सकडून खेळणारा न्यूझीलंडचा खेळाडू केन विल्यमसन दुखापतग्रस्त झाला होता. त्याला पूर्ण हंगामाला मुकावे लागणार आहे. बंगळुरूचा गेल्या वर्षीचा स्टार देशी खेळाडू रजत पाटीदारही दुखापतीमुळे आयपीएलच्या चालू हंगामाबाहेर झाल्याचे वृत्त आहे.

पूर्वी क्रिकेटचे सामने हंगामानुसार ठराविक काळात होत असत. हल्ली वर्षभर कुठे ना कुठे सामने होतच असतात. पैशासाठी खेळाडूही सातत्याने मालिका, लीग खेळताना दिसतात, मात्र व्यस्त वेळपत्रकामुळे खेळाडूंच्या दुखापतींचे प्रमाण वाढले आहे. अशाच प्रकारे आयपीएल 'इंजुअर्ड प्रीमियर लीग' बनली आहे. दुसरीकडे हे संकट नव्या खेळाडूंना संधी निर्माण करीत आहे. आयपीएल लिलावात खरेदीदार न मिळालेल्यांनाही आता संघात स्थान मिळू लागले आहे. हे खेळाडू आता कशी कामगिरी करतात यावर त्यांचे पुढील क्रीडा भवितव्य अवलंबून असेल.

**-समाधान पाटील, पनवेल**

---

# पनवेलच्या रम्य त्या आठवणी!

**काल संध्याकाळी वडाळे तलावावर चक्कर झाली. तसा मी रोजच जातो सकाळी मॉर्निंग वॉकला, पण तेव्हा काय फटफटीत उजाडलेले असते. त्यामुळे तलावातले आणि भोवतीचे लायटिंग बंद झालेले असते. काल संध्याकाळी मात्र हे लायटिंग बघायला मिळाले. तलावात उडणारे रंगीबेरंगी कारंजे व फोकसच्या प्रकाशात चमकणारे तलावाचे पाणी, तलावातल्या खडकावर चमकणारी स्वयंप्रकाशित हरणं, जॉगिंग ट्रॅकच्या बाजूने बसवलेले पिवळसर प्रकाश देणारे हेरीटेज लूक असलेले पथदिवे हे सगळं वडाळे तलावाच्या सौंदर्यात भर घालतं होतं. नाही म्हणायला लोकांनी केलेला कचरा या सौंदर्याला गालबोट लावत होता, पण तो काही नागरिकांच्या असंवेदनशीलतेचा विषय आहे.**

वडाळे तलावाचे सौंदर्य पाहिल्यावर पन्नास वर्षांपूर्वीचे पनवेल आणि आताचे पनवेल यात तुलना करण्याचा मोह अनावर झाला. पन्नास-पंचावन्न वर्षांपूर्वी माझी आई वडाळे तलावाला लागून असलेल्या के. व्ही. कन्या विद्यालय या शाळेत शिक्षिका होती. त्या काळी आतासारखे शाळेने अजस्त्र रूप धारण केलेले नव्हते. छोटीशी दुमजली एकच इमारत होती शाळेची. तिथेच सकाळी प्रायमरी, तर दुपारी सेकंडरी शाळा भरे. मी त्याच प्रायमरी शाळेत शिकत होतो. माझी शाळा सुटायच्या वेळी आईची शाळा भरत असे. घरात कोणीच नाही म्हणून शाळा सुटल्यावर मी शाळेतच थांबत असे. शाळेत येताना आई माझ्यासाठी डबा घेऊन येत असे. तेव्हा तलाव आणि शाळा यामध्ये सध्या अस्तित्वात असलेला रस्ता नव्हता. आजूबाजूला झालेल्या इमारती नव्हत्या. हायवेपासून ते स्मशानभूमीला लागून ते अशोक बागेला लागून बल्लाळेश्वर देवळाच्या घाटावरून ते शाळेच्या कंपाउंडपर्यंत असे भले मोठ्ठे तळे होते. गुलाबी कमळांनी, हिरव्यागार कमळ काकड्यांनी सदा बहरलेलं. शाळेच्या कंपाउंडच्या दगडावर बसून कमळ, बदकं, बगळे, विविध पक्षांच्या सानिध्यात बसून मी कित्येक वर्षे डब्बा खाल्लेला आहे. आजही तो दगड तिथेच त्याचं स्थितीत आहे.

अशीच लोप पावलेली एक गोष्ट म्हणजे टांगे आणि त्यांच्या घोड्यांसाठी उभारले पाणोठे! विसावा हॉटेलसमोर, टिळक रोडवर अन्नपूर्णासमोर, टपाल नाक्यावर, इंग्रजकालीन दगडी पाणोठे होते. पनवेल बसस्थानक हीही एक अशीच इतिहासजमा झालेली वास्तू. फार पूर्वी म्हणजे पन्नासएक वर्षांपूर्वी पनवेल बसस्थानक हे पनवेलकरांचे फिरायला जायचे ठिकाण होते. त्या काळात हायवेला रहदारी तुरळक असायची. तासभर जर आपण हायवेच्या कट्ट्यावर बसलो तर फारतर पाच-दहा एसट्या अथवा ट्रक दिसत. फारतर एखाद दोन मोटारी. अख्ख्या पनवेलमध्ये येथील धनिक अतुल पुराणिक यांच्या परदेशी बनावटीच्या दोन होंडा कंपनीच्या मोटरसायकल होत्या. एक मँगो कलरची, तर दुसरी निळी. या व्यतिरिक्त पनवेलमध्ये सायकलींचे अधिराज्य असे. सुटीच्या दिवशी पनवेल बसस्थानकावर फिरायला जायचा बेतं आई-बाबा आखतं. मग संध्याकाळी उन्हं उतरली की आमचा कुटुंबकबिला बसस्थानकाबाहेरील कट्ट्यावर दिसे. रस्त्यावरून येणारी एखादी गाडी दिसली की दुसऱ्या टोकाला दिसेनाशी होईपर्यंत पाहत रहाणे हीच आमच्यासाठी मजा. तासभर भुईमुगाच्या शेंगा खात या मजेचा आस्वाद घेऊन, मोकळ्या हवेचा आनंद लुटून झाला की मग रोड क्रॉस करून गावात शिरायचं. रस्त्याला लागून असलेल्या जकात नाक्यासमोर वडापाव, भेळ-पाणीपुरी, सरबताच्या, भुईमुगाच्या शेंगांच्या अशा दोनचार हातगाड्या लागत. काळगेलासा पंढरी मुछवाला भैया फेमस होता. तर तिथे भेळ पाणीपुरी एखादा ग्लास सरबत अशी पंचतारांकित मजा करून झाली की जगातला सगळ्यात श्रीमंत मीच अशा थाटात आमची स्वारी घरी परतायची आणि मग या आनंदाच्या आठवणी काढतं पुढचे दोन महिने मजेत जायचे. अहो त्या काळातलं एक गुपित सांगायचं तर समजा कॉलेज जीवनात एखादी सुंदर मैत्रीण भेटलीच तर... त्या काळी तशी भेटणं फार मुश्कील काम होतं, पण त्यातूनही भेटलीच तर तिला घेऊन काहीतरी खावं म्हणावं तर खिशात पैसेही नसत आणि ते असले जरी तरी जाण्यासाठी चांगलेसे हॉटेलही नव्हते. एक टपाल नाक्यावर आश्रय आणि सोसायटीत जोशी लंच होम म्हणजे आताचे सागर. हातगाडीवर खायची चोरी, कारण गाववाले बघतील! शंभर टक्के लोक एकमेकांना ओळखायचे.

पनवेल बसस्थानकाप्रमाणे फिरायला जाण्याचे दुसरे ठिकाण म्हणजे पनवेलच्या पश्चिम टोकाला असलेले बंदर! पुरातन काळात या बंदराला अनन्यसाधारण असे महत्त्व होते, पण काळाच्या ओघात हे बंदर बाजूला पडले. तरीसुद्धा चाळीस-पन्नास वर्षांपूर्वी येथून मिठाचा व्यापार चालत असे. त्यामुळे बंदरावर कायम मिठाच्या गोणींच्या राशी असतं. पनवेलकर घरून भेळेचे सामान अथवा वडापाव घेऊन बंदरावर फिरायला जात असत. गोणींवरून उड्या मारत खेळण्यात तास दोन तास मजेत जात. एकेकाळी निर्जन असलेला असा हा भाग आता गजबजून गेला आहे.

बंदराप्रमाणेच तिसरे फिरण्याचे ठिकाण म्हणजे जुना ठाणा नाका! माझ्या माहितीप्रमाणे वाशीचा खाडी पूल होण्याआधी पनवेलवरून जाणारा रस्ता ठाण्यालाच जात असे आणि ठाण्याला जाणाऱ्या रस्त्यावरचा नाका म्हणून 'ठाणा नाका' हे नाव पडलं असावं. काळण समाज हॉलजवळील एक दोन चाळी सोडल्या की पुढील सगळा रस्ता दुतर्फा दाट झाडीने व्यापलेला होता. दिवे लावणीनंतर फिरकायलाही भीती वाटावी असा हा रस्ता अगदी पुढच्या टोकाला एचओसी कॉलनीजवळ काय ती जागा बाकी सगळं सुनसान, पण टोळक्याने फिरायला जायला खूप मजा यायची. रस्त्यात कधी मुंगुस, तर कधी साप दिसायचा, कधीतरी दस नंबरी जातिवंत नाग दर्शन द्यायचा, एखादी नानेटी पायाखालून सळसळत जायची, कधीतरी आजूबाजूच्या झाडीत कासवराज दर्शन द्यायचे, मोठ्या आकाराच्या गोगलगायी हळूहळू चालताना दिसायच्या, कोकिळांच्या ताना कानी पडायच्या, दर्शन झाल्यास भाग्य उजळते असा समज असणारा सोनकावळा (भारद्वाज) दर्शन द्यायचा. खूप छान वाटायचं त्या रस्त्यावरून फिरताना.



असेच एक फिरण्याचे ठिकाण म्हणजे डोंबाळ्याचे ए.एस.सी कॉलेज! पनवेलबाहेरील डोंगराच्या कुशीत, गर्द वनराईत वसलेले! हिरवागार, शांत, रम्य परिसर. या कॉलेजच्या आजूबाजूने पावसाळ्यात धबधबे पडत. अतिशय विलोभनीय दृश्य असे. जाऊन हिरव्यागार गवतावर बसावं, घो घो वाहणाऱ्या वाऱ्याचं संगीत ऐकावं. दोन एक तास घालवून, टवटवीत होऊन घरी परतावं. एवढी सगळी ठिकाणं फिरून झाली की फिरायचं उरायचं ते पनवेल रेल्वे स्टेशन! ही एक अजबच वास्तू. या ठिकाणाचा वापर रेल्वेसाठी कमी व इतर कामांसाठी जास्त व्हायचा, कारण तेव्हा दिवसात चारच ट्रेन जा-ये करीत असत. बाकी दिवसभर स्टेशन सुनसान! मग त्याचा वापर फिरण्यासाठी व सिनेमाच्या शुटींगसाठी चाले. अनेक सिनेमांची शुटींग त्या काळी पनवेलला झाली आहेत. गावापासून दूर निसर्गरम्य ठिकाण म्हणून पनवेल रेल्वे स्टेशनची ख्याती होती. पूर्वी लांब लांब वाटणारी ही ठिकाणं आता लोकवस्ती वाढल्यानं जवळ आली आहेत.

**-मोहन तळेकर, पनवेल**

# कॉँग्रेसच्या मनोज खेडकर यांचा कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश

## ■ माथेरानच्या विकासकामांसाठी सर्वतोपरी सहकार्य –आमदार महेंद्र थोरवे

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरानच्या विकासकामांसाठी सर्वतोपरी सहकार्याचे आश्वासन आमदार महेंद्र थोरवे यांनी दिले आहे. त्यांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी कॉँग्रेसचे मनोज खेडकर, माजी विरोधी पक्षनेते शिवाजी शिंदे, पतसंस्था माजी सभापती हेमंत पवार यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. यामुळे आगामी काळात नक्कीच माथेरान शहराचा कायापालट होण्याची चिन्हे या निमित्ताने स्पष्टपणे दिसून येत आहेत.



माथेरान नगरपरिषदेच्या निवडणुका लांबणीवर गेल्याने येथील राजकीय पक्षांनी आगामी निवडणुकीमध्ये सत्ता स्थापन करण्यासाठी अगोदरच युत्या आघाड्या अप्रत्यक्षपणे जाहीर केल्या होत्या. सर्व प्रकारची गणिते आखली होती, परंतु याच वेळी काँग्रेसचे अध्यक्ष मनोज खेडकर यांनी आपल्या पक्षातील समस्त कार्यकर्त्यांना सोबत घेऊन कर्जत खालापूर मतदार संघाचे कार्यासम्राट आमदार महेंद्र थोरवे यांच्या कार्यपद्धतीवर खुश होऊन शिवसेनेच्या माध्यमातून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी शिंदे गटाच्या शिवसेनेचे सदस्यत्व आमदार थोरवे यांच्या वाढसदिवसाचे औचित्य साधून स्वीकारले आहे.

गावातील एक अभ्यासू व्यक्तीमत्व त्याचप्रमाणे राजकीय डावपेच ज्ञात असणारे, शासकीय निधी आणून विविध विकास कामे कशापद्धतीने पार पाडली जाऊ शकतात. याची खडानखडा माहिती असणारे खेडकर यांच्या रूपाने शिवसेनेला लाभली असल्याने एरव्ही दर निवडणुकीत ठराविक जागा प्राप्त करून समाधानी असणाऱ्या शिवसेनेला पुन्हा एकदा एकहाती सत्ता स्थापन करण्यासाठी आमदारांच्या पाठबळावर प्राप्त होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे माथेरान शिवसेनेला मोठी राजकीय ताकद मिळाली आहे. आमदार थोरवेंनी सुध्दा माथेरानच्या विकास कामांसाठी सर्वतोपरी सहकार्याचे आश्वासन दिल्याने आगामी काळात नक्कीच माथेरान शहराचा कायापालट होण्याची चिन्हे यानिमित्ताने स्पष्टपणे दिसून येत आहेत.

आमदार थोरवे यांच्या वाढदिवसानिमित्त माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, माजी विरोधी पक्षनेते शिवाजी शिंदे, सुनील शिंदे यांच्यासह पतसंस्थेचे माजी सभापती हेमंत पवार, उद्योजक भास्कर शिंदे मंगेश परदेशी, राकेश कोकळे, मंगेश शिंदे, अंबालाल वाघेला, आदित्य भिलारे, निमेश दळवी, वैभव पवार, विठ्ठल पवार, केतन रामाने नितीन शहा, मुकेश शहा, चंद्रकांत सुतार, नरेश शिंदे, विजय कदम, मुनील नाईकडे, प्रतीक नाईकडे, दिलीप कदम, अफजल डोंगरे, विजयेंद्र देशमुख, संजय कदम, अशोक साबळे, राजेंद्र देशमुख विजय मोरे स्वप्निल गोसावी, सुमित परीट हर्ष शिंदे, नरेश साबळे, विशाल बिरामणे, किरण पार्टे, अंकित पार्टे, अमोल काळे, कुमार शेट्ये, अरुण शेट्ये, सुनील कदम, अमोल काळे,निकिता देशमुख, भारत कारंडे, महेश तुपे, कामिनी शिंदे, गिरीजा शिंदे, विदुला खेडकर, वर्षा शिंदे, सुहासिनी दाभेकर, मंदाकिनी तुपे, शुभांगी शिंदे यांनी स्वेच्छेने शिवसेनेत गावाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी पक्षप्रवेश केला आहे.

**माजी विरोधी पक्षनेते शिवाजी शिंदेही दाखल**

या पक्षप्रवेशामध्ये माजी विरोधी पक्षनेते शिवाजी शिंदेंनी मागील दहा वर्षातील विरोधकांची भूमिका निस्वार्थीपणे मांडली आहे. नैसर्गिक आक्रमकता आणि जलद विकासाचा पुरस्कर्ता शिवाजी शिंदे यांच्या प्रवेशाने आगामी काळात शिवसेनेला पक्षवाढीसाठी बळ मिळणार आहे. एकंदरीत यांच्या कार्यपद्धतीचा शिवसेनेला आगामी निवडणुकीत मोठा फायदा होणार आहे.

# माथेरान घाटात बर्निंग कारचा थरार

**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरान घाटात एका पर्यटक वाहनाला आग लागल्याची घटना घडली आहे. या अपघातात कुठलीही जीवित हानी झाली नसली तरी कार जळून खाक झाली आहे. हुंडाई कंपनीची सीएनजीआय टेन ही कार असून यामध्ये दोन प्रवाशी प्रवास करत होते. ही आग कारचा पेट्रोल पाईप फाटला असल्याने लागली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

पर्यटनस्थळ असणाऱ्या माथेरान फिरण्यासाठी म्हणून उल्हास नगर येथील दोन व्यक्ती आपल्या हुंडाई कंपनीची सीएनजीआय टेन या खाजगी वाहनाने सायंकाळी साडे पाच वाजण्याच्या सुमारास आले होते. माथेरान घाट चढत असताना प्रसिद्ध असा जुमापट्टी स्थानकातील वरच्या धबधबा येथील चढावावर कारच्या पुढील भागातून आग लागल्याचे चालकाच्या निदर्शनात आले. सावधगिरी बाळगत चालकाने कार रस्त्यात उभी करून कारच्या बाहेर सुखरूप पडले होते. यावेळी रस्त्यावरील वाहतूक बाधित झाली होती. कारने अचानक भडका घेत कार जळून खाक झाली.

**प्रवासी थोडक्यात बालंबाल बचावले**



**कार जळून खाक**

नेरळ टॅक्सी चालक मालक संघटना व ग्रामस्थांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला परंतु आगीचा भडका अधिक असल्याने कार पूर्णतः जळाली.कार सीएनजी गॅस असून घाटात चालक कार पेट्रोलवर चालवत असताना पेट्रोल पाईप फाटल्याने हा प्रकार घडला असावा,असा अंदाज येथील चालकांकडून लावला जात आहे. घटनास्थळी माथेरान अग्निशमन दलाचे वाहन पोहचले होते परंतु तोपर्यंत कार जळून खाक झाली.

# साळाव पुलाच्या दुरुस्तीमुळे प्रवासी वाहतूक साळाव, भालगावमार्गे सुरू

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड–अलिबाग मार्गावरील साळाव पुलाच्या दुरूस्तीचे काम सुरू असल्याने जिल्हाधिकारी रायगड यांच्या आदेशावरून रेवदंडा पुलावरून राज्य परिवहन मंडळाची प्रवाशी वाहतूक सेवा बंद करण्यात आली आहे.

त्यामुळे प्रवाशी वर्गाची गैरसोय होत असल्याने मुरूड आगारामार्फत नियमितप्रमाणे सुरू असणारी प्रवाशी वाहतुक ही मुरूड साळाव –चणेरा–रोहा –नागोठणे मार्गाने सुरू केली असून काही फेर्या भालगाव –रोहा मार्गे वळवण्यात आल्या आहेत. वाहतुकीच्या मार्गात बदल झाल्याने रा. प. मुरूड आगाराच्या बसेसचे आरक्षण हे स्थगित ठेवण्यात आले होते . ते ७ एप्रिल २०२३ पासून बदललेल्या मार्गाने पुन्हा सूरू करण्यात आले आहे. रा.प. मुरूड आगाराकडून खालील फेऱ्या आरक्षणाकरीता ऊपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती आगार व्यवस्थापक नीता जगताप यांनी दिली आहे .

सुधारीत वेळापत्रक पुढील प्रमाणे : मुरुड साळाव –मुंबई : – सकाळी ४.४५,८.३०, १०.००,११.३०,११.३०,,१७.३०,२३.००. मुंबई –साळाव –मुरुड:– १.००, ०६:१५, ०९.००,१०४५ ,१४,०० ,१६.०० .१८,३०. मुरुड – भालगाव –मुंबई:– ०६.३०,१५.००. मुंबई– भालगाव मुरुड:– ००.३०. मुरुड –साळाव –कल्याण :– १२.३०,१४.३०. कल्याण– साळाव–मुरूड :– ५.००, ६.००. मुरूड भालगाव बोरिवली :–११.३० . बोरिवली भालगाव मुरूड :– ५.००. मुरूड साळाव बोरिवली :– १४.००. बोरिवली–साळाव मुरूड :६.००. मुरूड– साळाव –भांडूप :६.००. भांडूप साळाव मुरूड :१३.००. मुरूड साळाव मुलुंड :– १६.३०. मुलुंड साळाव मुरूड :६.३०

मुरूड येथून साळाव करिता ५.४५, ८.१५, ११, १३.३०,१५.३० व साळाव येथून मुरुडसाठी ७.१५, ९.३०,१२.४५,१४.४५,१७ या नियमित फेऱ्या सूरू केल्या आहेत. प्रवाशांचा प्रतिसाद बघून ऊर्वरित फेऱ्या पुन्हा सुरू करण्यात येतील. प्रवाशांनी राज्य परिवहन सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन मुरुड आगार व्यवस्थापक नीता जगताप यांनी केले आहे. साळाव पुलाची दुरुस्ती लवकर करून पूर्ववत प्रवासी सेवा अलिबाग मार्गे करावी जेणे करून नाहक आर्थिक भुर्दंड व वेळ वाचेल, अशी अपेक्षा प्रवाशांतून होत आहे.

# पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार प्रदान

**अलिबाग : प्रतिनिधी**

महिला व बालविकास क्षेत्रातील उत्कृष्ट काम करणाऱ्या समाजसेविकांच्या व संस्थांच्या कामाची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीकोनातून महिला व बाल विकास विभागांतर्गत राज्यातील समाजसेविका व संस्थांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार १९९६–९७ पासून देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागामार्फत महिला व बालविकास क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिला व संस्थांना दरवर्षी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार दिला जातो.

शासनाकडून २०१३–१४ ते २०१९–२० या वर्षांचे राज्य, विभाग व जिल्हास्तरीय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कारार्थीची निवड घोषित करण्यात आली आहे. त्यामध्ये कोकण विभागासाठी विभागीय स्तर व रायगड जिल्हास्तरीय पुरस्कारार्थींचा पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते सन्मान सोहळा जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात संपन्न झाला. यावेळी आमदार महेंद्र दळवी, कोकण विभागीय आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विनित म्हात्रे, जिल्हा परिविक्षा अधिकारी अशोक पाटील, श्रीमती शकुंतला वाघमारे आदि मान्यवर उपस्थित होते.

पुरस्कारार्थींची माहिती पुढीलप्रमाणे :– कोकण विभागस्तरीय पुरस्कार–२०१५–१६ करिता वनवासी विकास सेवा संघ, उसरोली, पो.मजगाव, ता. मुरुड, जि. रायगड, २०१७–१८ करिता आश्रय सोशल फाऊंडेशन, पनवेल, जि.रायगड.

रायगड जिल्हास्तरीय पुरस्कार– २०१३–१४ करिता– मिनल मिलिंद टिपणीस, सार्थक प्लॉट नं.४,रोड नं.७,सेक्टर १९,नवीन पनवेल,जि.रायगड. २०१४–१५ करिता– सौ. प्रमिला रोहिदास चव्हाण, मु.जामरुंग, पो.आंबिवली, ता. कर्जत, जि.रायगड. २०१५–१६ करिता– शुभांगी दत्तात्रेय झेमसे, सदनिका क्र.१११, युनिक बाजार, पेण, जि.रायगड. २०१६–१७ करिता–निहा अनिक राऊत, जि.रायगड. २०१७–१८ करिता– सुप्रिया विभिषण जेधे, जि.रायगड.

# गुगल पेवरून ९९ हजार ९९९ रुपयांची फसवणूक

**माणगाव : प्रतिनिधी**

सायबर कॅफेमध्ये काम करणाऱ्या महिलेची गुगल पे या यूपीआय ॲपवरून ९९ हजार ९९९ रुपयांची फसवणूक झाल्याची घटना घडली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ६ एप्रिल रोजी सायंकाळी ६.४४ वा. च्या सुमारास फिर्यादी पायल महादेव तांबे, व्यवसाय– सायबर कॅफेमध्ये नोकरी, रा. हातकेली, पो. होडगाव या कामावरून घरी जात असताना त्यांच्या मोबाईलवर बँक ऑफ इंडिया शाखा माणगांव यांचेकडून बँक अकाऊंटमध्ये एकूण २ लाख २५००० रुपये जमा रकमेपैकी ९९ हजार ९९९ इतकी रक्कम पायल तांबे यांच्या गुगल पे अकाउंट नंबरवरून दुसऱ्या यूपीआय आयडीवर जमा झाल्याचा मॅसेज आला. त्यावेळी पायल तांबे यांना त्यांची फसवणूक झाल्याचे लक्षात आले. गुगल पे कस्टमर मोबाईल क्र. ७४७८२७५६७४ यांनी विश्वास संपादन करून ही फसवूक केल्याचे त्यांच्या लक्षात आले.

या घटनेची नोंद माणगांव पोलीस ठाणे येथे कॉ. गु. र. नं. ९५/२०२३ भा. दं. वि. सं. क. ४२० माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००८ चे कलम ६६ (क) प्रमाणे करण्यात आली असून पुढील तपास पो. नि. राजेंद्र पाटील करीत आहेत.

# आंबेवाडी ते निवीपर्यंतच्या कालव्याच्या कामाबाबत ग्रामस्थांचा आक्रमक पवित्रा; तहसीलदारांशी केली चर्चा

**धाटाव : प्रतिनिधी**

आंबेवाडी ते निवीपर्यंतच्या कालव्याला अद्याप पाणी सोडण्यात आले नाही. मूळात कालव्याची कामेच पूर्ण नाहीत. याबाबतच ग्रामस्थांत संताप असतानाच तिसे ग्रामपंचायतीच्या हद्दीतील मोठ्या सायपनची काम स्थानिकाच्या गोंडस नावाखाली एका ठेकेदाराने थांबविल्याने कालव्याच्या कामाला भलतीच खीळ बसली. मला भेटायला सांगा, तुमचा शेठ मला भेटल्याशिवाय काम सुरू करू देणार नाही अशी अरेरावी माणसे पाठवून संबंधीत ठेकेदाराने कामगारांना केली आणि कालव्याचे काम थांबवले. त्यामुळे आधीच उशीर झालेल्या कालव्याचे पाणी तहानलेल्या गावांना मिळणार कधी, कालव्याची कामे पूर्ण होणार कधी ? असा सवाल उठवत शनिवारी समन्वय समितीच्या ग्रामस्थांनी काम थांबवणाऱ्याच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेतला.



तहसीलदार किशोर देशमुख यांच्याशी चर्चा केली तर कालव्याचे काम करणाऱ्या अधिकृत ठेकेदाराला धमकावल्याप्रकरणी दखल घ्या, असे आशयाचे निवेदन शनिवारी दि. (८) संबंधीत ग्रामस्थांनी कोलाड पोलीस ठाण्याचे सहा पोलीस निरीक्षक अजित साबळे यांना दिले. दरम्यान, कालव्याची कामे तातडीने न केल्यास, कालव्याला पंधरा दिवसात पाणी न सोडल्यास आम्ही पुन्हा आंदोलन करण्यावर ठाम आहोत असा ईशारा ग्रामस्थांनी दिला तर कालव्याची कामे व कालव्याला पाणी सोडण्याचा प्रश्न तात्काळ मार्गी लावू अशी प्रतिक्रिया तहसीलदार किशोर देशमुख यांनी दिली. त्यामुळे आता कालव्याची कामे नक्की कधी पूर्ण होऊन कालव्याला पाणी सोडले जाते? याकडे सबंध ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

आंबेवाडी ते निवीपर्यंतच्या कालव्याला पाणी नसल्याने विभागात कायम भयान स्थिती उद्भवते हे प्रशासन व सृजान समाजासमोर आले आहे. तत्कालीन तहसीलदार कविता जाधव यांनी अत्यंत गांभीर्याने कालव्याच्या पाण्याकडे लक्ष घातले. रायगड पाटबंधारेच्या कार्य अभियंता दीपेश्री राजभोज यांनी कालव्याच्या कामे निधीसाठी शर्तीचे प्रयत्न करून कामाला गती दिली. ५० वर्षानंतर सायपनची कामे अद्ययावत होत आहेत. कालव्याची साफसफाई झाली. विभागीय अभियंता महामुनी, अभियंता गोरेगावकर यांनी ग्रामस्थांच्या भावना जपत जाणीवेतून सतत पाठपुरावा केला आहे. आजगायत अंदाजे ७० टक्के कामे पूर्ण झाली. दुसरीकडे सर्वात मोठा सायपन असलेल्या तिसे ग्रामपंचायत हद्दीतील कामाला प्रारंभ करणार तोच राजकीय धोंडे आडवे यायला सुरुवात झाली.

मला भेटायला सांगा, तोपर्यंत काम करायचे नाही, अशी धमकी संबंधीताच्या लोकांनी दिल्याने कामगार बिथरले. त्यांनी काम करण्यास नकार दिला. कालव्याचे कामच ठप्प झाल्याने ग्रामस्थ आक्रमक झाले. अधिकृत ठेकेदाराच्या माणसांना, यंत्रणांना संरक्षण द्या, असे निवेदन कोलाड पोलीस ठाण्याचे सहा पोलीस निरीक्षक अजित साबळे यांना ग्रामस्थांनी देऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी कालवा समन्वय समितीचे विठ्ठल मोरे, तुकाराम भगत, चंद्रकांत बामुगडे, प्रशांत राऊत, राजेंद्र जाधव, अंतोष शिर्के व ग्रामस्थ उपस्थित होते.

कालवा कामाची पाहणी पाटबंधारेचे अधिकारी, ग्रामस्थ यांच्या समवेत तातडीने केली जाणार असल्याचेही सुतोवाच देशमुख यांनी दिले. अशात कालव्याचे काम थांबविले जाणार नाही, याकडे प्रशासनाने पाहावे, अन्यथा आम्ही ग्रामस्थ पाण्यासाठी पुन्हा आंदोलन सुरू करू असा इशारा ग्रामस्थ प्रशांत राऊत यांनी दिला. कालव्याच्या कामाला, पाण्याला कोणीच अडथळा आणू नयेत, पाण्याचे पुण्य घ्या, विरोध करू नका असे आवाहन विठ्ठल मोरे यांनी केले. दरम्यान, संबधीत अधिकृत ठेकेदाराने कालव्याचे काम सुरू करावे, काही अडचण आल्या तर आम्हाला कळवा, असे स्पष्ट आश्वासन सहा. पोलीस निरीक्षक अजित साबळे यांनी दिले, तर तहसील, पोलीस प्रशासनाने पाण्याबाबतच्या प्रकरणाची तातडीने दखल घेतली आहे.

**पाणी प्रश्न तातडीने मार्गी लावा**

तहसीलदार किशोर देशमुख यांनीही कालव्याचा पाणी विषय गांभीर्याने घेतला आहे. कालव्याची कामे व पाणी प्रश्न तातडीने मार्गी लावा, अशा सूचना पाटबंधारे प्रशासनाला दिल्याची प्रतिक्रिया देशमुख यांनी दिली.

**प्रशासनाला निवेदन**

कालव्याचे काम थांबवले हे समजतात विभागीय ग्रामस्थ अधिकच आक्रमक झाले. संबंधीत ठेकेदाराविरोधात कोलाड पोलीस प्रशासनाला दखल घेण्याबाबतचे निवेदन ग्रामस्थांनी दिले आहे.

# नेरळमध्ये भरड धान्याच्या माध्यमातून चैत्रगौरी सोहळा

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ येथील महिला मंडळ संस्थेच्या वतीने भरड धान्य प्रदर्शन आणि चैत्र गौरी सोहळ्याचे आयोजन केले होते.

६० वर्षाची परंपरा असलेल्या नेरळ येथील महिला मंडळ संस्थेच्या वतीने महिला मंडळ सभागृहात भरड धान्य प्रदर्शनाचे आयोजन केले होते. भारतात २०२३ हे वर्षे भरड धान्य वर्षे म्हणून घोषित झाले आहे. त्यानिमित्ताने १६ प्रकारच्या भरड धान्यांचे प्रदर्शन मांडले होते. त्यात नाचणी, वरी, बाजरी, ज्वारी, राजगिरा, राळे अशा प्रकारच्या धान्या बाबत माहिती अपर्णा काळे यांनी उपस्थितांना दिली. यावेळी त्यांनी बोलताना भरड धान्य आणि तृणधान्य हे आपल्या शरीराच्या रचने नुसार बनली आहेत. त्यांचा वापर आपल्या आहारात केल्यास अनेक आजार आपण टाळू शकतो. असे सांगितले. 'आपल्या रोजच्या आहारात गहू आणि तांदळाचा वापर केल्यास पोष्टिक पर्याय उपलब्ध होऊ शकतो. असे सांगून भरड धान्याचे महत्व लक्षात घेवून त्यांचे पदार्थ आपल्या आहारात घ्यावेत.' अशी सूचना कर्वे यांनी केली.

# माणगाव परिसरात अवकाळी पाऊस; वीजपुरवठा खंडित

**माणगाव : रामप्रहर वृत्त**

जोरदार वाऱ्यासह उतेखोल माणगावमध्ये शुक्रवारी अवकाळी पाऊस अचानक बरसला. पाऊस अशातच वीज पुरवठा काहीक्षण खंडीत झाला. उतेखोल येथील पाणीपुरवठा जलशुद्धीकरण केंद्रातील जॅकवेल जवळील डिपी (ट्रान्सफॉर्मर) मध्ये ठिणग्या उडत बिघाड झाल्याने तो बंद करावा लागला असून शनिवारी दुपारनंतर त्याची दुरुस्ती करणार असल्याचे महावितरणकडून सांगण्यात आले. त्यामुळे रात्री पासूनच माणगांव नगरपंचायत हद्दीतील पाणी पुरवठा खंडित झाला. तीन दिवस अवकाळी पावसाचा अंदाज अगोदरच वर्तविण्यात आला होता.

माणगांवच्या काही भागात पाऊस कमी प्रमाणात पडल्याचे माणगांवकरांमधुन बोलतात. परंतु उतेखोल गांव परिसरात पाऊस जोरदार बरसला. दिवसभर कडक तापमान जाणवत होते. सायंकाळी याची तीव्रता अधिक जाणवत होती. अंगातून घामाच्या धारा खूपच गरमा जाणवत होता. रात्रीच्या अंधारात दिव्यांच्या प्रकाशाकडे नविन पंख फुटलेल्या वाळवीचे थवे अनेक ठिकाणी आकर्षित झाल्याचे पाहताच, पाऊस नक्की पडणार असा समज गावाकडील माणस आजही व्यक्त करतात, ते भाकीत रात्रीच्या पावसाने पुन्हा एकदा खरे ठरले.

**CHANGE OF NAME**

I the undersigned **Damayanti Padmakar Kulkarni (old name)** residing at Mohopada Rasayani-410222 Tal.Khalapur Changed my name after marriage by the **Affidavit No.166/2023 dated 13/3/2023** so that I remitter issue may here after be called by **new name Mrs.Rajashree Ravindra Kulkarni**

**Sign/-**
Mrs.Rajashree Ravindra Kulkarni

## निवडक

### सराईत चोरट्याची पत्रकाराला धमकी

**नवी मुंबई :** येथील एका घरफोडी प्रकरणामध्ये सराईत गुन्हेगारांना पोलिसांनी अटक करून पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. या वेळी एका पत्रकाराने सराईत चोरट्यांचे फोटो काढत असताना या सराईत चोरट्यांचा टोळीतील एका चोरट्याने पोलिसांच्या समोरच पत्रकाराला धमकी दिली असल्याचा प्रकार घडला. यामध्ये ह्या सराईत चोरट्याने पत्रकाराला धमकी देताना म्हटले इथे फोटो शूट चालू आहे का तू पाहिलं का चोरी करताना, चुकून बाहेर भेटू नकोस, अशी धमकी दिली.

### पनवेल आयटीआयमध्ये चोरी

**पनवेल :** औद्योगिक प्रशिक्षण संस्था पनवेल येथील यंत्र निगराणी कार्यशाळेमधून लोखंडी साधनसामग्रीची चोरी झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पनवेल औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथील यंत्र निगराणी कार्यशाळेतील लोखंडी मांडणीवर ठेवलेले ८३० रुपये किमतीचे लेथ मशीनचे एकूण नऊ लोखंडी अँसेसरीज, १३४८ रुपये किमतीचे टुल अँड कटर ग्राईंडर मशीनचे एकूण २४ लोखंडी अँसेसरीज तसेच २२६० रुपये किमतीचे मिलिंग मशीनचे एकूण १८ लोखंडी अँसेसरीज असा एकूण ४४३८ रुपये किमतीचे ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### नवी मुंबईत हनुमान जन्मोत्सव साजरा

**नवी मुंबई :** हनुमान जयंतीनिमित्त श्री संत सावता विठ्ठल रखुमाई मंदिराच्या प्रांगणात रुक्मिणी महिला भजनी मंडळ सेक्टर ५ ऐरोली, ह.भ.प. श्री व सौ नवले महाराज व त्यांचे सर्व सहकारी यांचे भजन झाले. श्री संत सावता माळी मंडळाचे सर्वश्री नामदेव डोके, सुरेश साबळे, मारुती बनकर, किसन नाईक, रामदास खेडकर, हरिश्चंद्र भुजबळ, महादेव शिंदे, दत्तात्रय सिनलकर, अनिरुद्ध उमाळे, तारा सिनलकर, पाटोळे मावशी, मिश्रा, सूर्यकांत थोरात, पुणे जिल्हा उत्कर्ष मंडळाचे सेक्रेटरी रवींद्र औटी आदी उपस्थित होते.

### वाशीत आज मोफत आरोग्य शिबिर

**नवी मुंबई :** भाजप नवी मुंबई यांच्या सौजन्याने तसेच आमदार मंदा म्हात्रे यांच्या माध्यमातून वाशी सेक्टर १५ मीनाताई ठाकरे मैदानात रविवारी (दि. ९) सकाळी ९.३० ते १ वाजता मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नवी मुंबई वेल्फेयर फाउंडेशन यांच्या सहकार्याने तसेच हिरानंदानी फोर्टीस हॉस्पिटल वाशी, येही आय सानपाडा क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने सदर मोफत आयोजन करण्यात आले आहे. महाआरोग्य शिबिरामध्ये विविध तपासण्या, मार्गदर्शन, मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार असून मोफत औषधे, चष्म्याचे वाटप करण्यात येणार आहे.

# विविध कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

## आमदार महेंद्र थोरवे यांच्या वाढदिवसाचे औचित्य






**उरण : बातमीदार**

उत्तर रायगड शिवसेना जिल्हाप्रमुख आमदार महेंद्र सदाशिव थोरवे यांचा ५०वा वाढदिवस पोसरी कर्जत येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, पालकमंत्री उदय सामंत, आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी यांच्यासह अनेक मान्यवर या सोहळ्याला उपस्थित होते.

या वेळी उरण विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना संघटक कृष्णा बा. पाटील यांच्या कुशल नेतृत्वाखाली उरण तालुका व उरण मतदारसंघातून विविध विभागातून विविध सामाजिक पन्नास कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. या प्रवेश प्रक्रियेत उरण शिवसेना तालुकाप्रमुख अदिनाथ भोईर, गव्हाण विभागीय प्रमुख, प्रभाकर पाटील, संपर्कप्रमुख राजन म्हात्रे, जासई विभाग प्रमुख वैभव पाटील, रोहन कडू, चिरनेर विभागीय प्रमुख विजय पाटील, सचिन पाटील, तरघर शाखाप्रमुख संतोष मोकल, मोहा शाखाप्रमुख धनंजय कोळी यांच्यासह अनेक मान्यवर पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली. तर उलवे नोडमधील विविध व्यवसायानिमित्त स्थायिक झालेल्या उत्तर भारतीयांनी संतोष चौधरी, दत्ता ओझा, व शुभम दुबे यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने शिवसेनेत प्रवेश केला.

आमदार महेंद्र थोरवे यांनी सर्वांचे शिवसेनेत स्वागत केले आहे. तर मतदार संघाचे संघटक कृष्णा पाटील यांनी स्वागत करून प्रवेश करणाऱ्या शिवसैनिकांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# आवक वाढल्याने कांद्याचे भाव उतरले

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशीच्या बाजारात कांद्याची जादा आवक होत असून त्याप्रमाणात मालाला उठाव नसल्याने बाजारभाव उतरले आहेत. प्रतिकिलो आठ ते अकरा रुपयांवर विकला जाणारा कांदा सहा ते नऊ रुपयांवर आलेला आहे. एपीएमसी बाजारात डिसेंबर, जानेवारीत नवीन कांद्याची अधिक आवक होत असते.

या वेळी दर कमी होण्यास सुरुवात होते. आता बाजारात जुना साठवणुकीचा कांदा दाखल होत आहे. बाजारात कांद्याची पुणे, नाशिक, नगरमधून आवक सुरू असून शुक्रवारी तब्बल १०० गाड्या दाखल झाल्या आहेत. सर्वच बाजार समितीत कांद्याचे दर घसरले असून मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत ही पुरवठाच्या तुलनेत मागणी कमी असल्याने दरात घसरण पहावयास मिळत आहे. गुरुवारी बाजारात सर्वांत आकाराने मोठा कांदा प्रतिकिलो ११ रुपयांनी उपलब्ध होता, परंतु बाजारात शुक्रवारी दरात आणखीन घसरण झाली असून नऊ रुपयांनी विक्री झाला तर त्याच्या खालील दर्जाचा कांदा सहा ते सात रुपयांनी विक्री होत आहे.





पनवेल : खारकोपरचे ज्येष्ठ भाजप नेते तसेच गावचे माजी अध्यक्ष हभप वसंतशेठ पाटील यांना मशाल सामाजिक संस्थेचा संगीत भूषण पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी कामगार नेते महेंद्र घरत, उपसरपंच विजय घरत, कोपर भाजप अध्यक्ष सुधीर ठाकूर, अनंताशेठ ठाकूर, किशोर पाटील, भाऊ भोईर, आशिष घरत, संदीप म्हात्रे, व्ही. के. ठाकूर उपस्थित होते.

# तुर्भे एपीएमसी मार्केट परिसरात वाहतूक कोंडी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

रमजान ईदनिमित्त फळांची आवक संपूर्ण महाराष्ट्रातून होत आहे. एपीएमसी मार्केट हे प्रसिद्ध मार्केट असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अवजड वाहने तुर्भे एपीएमसी मार्केटमध्ये येतात. त्यामुळे अवजड वाहनांची मोठी वरदळ या ठिकाणी असते, परिणामी परिसरात वाहतूक कोंडी होते.

दरम्यान, तुर्भे एपीएमसी वाहतूक विभागामार्फत योग्य नियोजन केल्यामुळे एपीएमसी फळ मार्केटमध्ये वाहतूक कोंडीतून सुटका करण्यात आली. अवजड वाहनांची वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी दुपारी ३ वाजेपर्यंत लाईनमध्ये उभे राहावे लागत आहे. त्यात सद्या आंब्यांचा सिजन असल्यामुळे जास्त गाड्या मार्केटमध्ये येतात, मात्र वरिष्ठांच्या आदेशानुसार, व्यवस्थित नियोजन केल्यामुळे मार्केटमध्ये गर्दी होत नसल्याचे तुर्भे एपीएमसी वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांनी सांगितले.

# सानपाडा कॉलेजमध्ये प्लेसमेंट ड्राईव्ह



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ओरिएंटल एज्युकेशन सोसायटीच्या, सानपाडा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड टेक्नॉलॉजी यांच्या वतीने नुकतेच ओरिएंटल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष हुमेरा जावेद खान, सरचिटणीस वसीम जावेद खान, खजिनदार डॉ. अजीम जावेद खान, सीईओ डॉ. हैदर-ई-करार, सानपाडा कॉलेजचे प्राचार्य डॉ. चंद्र बी. मौर्य यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सात विभागांसाठी कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन केले होते.

प्लेसमेंट ड्राईव्हचा उद्देश विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी मिळण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि जॉब मार्केटचे मौल्यवान एक्सपोजर मिळवणे हा आहे. कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हची सुरुवात विद्यार्थ्यांची नोंदणी आणि प्लेसमेंट सेलद्वारे आवश्यक रेझ्युमे आणि इतर कागदपत्रे गोळा करून झाली. विद्यार्थ्यांना कंपन्या आणि त्यांच्या गरजा याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या. कॅम्पसला भेट देणाऱ्या आघाडीच्या कंपन्यांमध्ये विप्रो, एक्सेंचर Xangars, इंडियाफिलिंग्ज, मार्केटिंग सोल्युशन्स 4U, ग्लोबल होम्स, कॉम्केट, स्क्वेअर यार्ड्स, भारती एअरटेल सबलाइम, सॅमीनफोटेक, एचडीएफसी लाइफ, एडेको इंडिया, थिंकपार्म्स इन्फोटेक, मर्स, सिनर्जी, ओडिगो पॉइंट या होत्या. एक इ. कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह एखाद्या उत्सवाप्रमाणे होते आणि सुमारे २४० विद्यार्थ्यांनी अनेक कंपन्यांच्या मुलाखतींना हजेरी लावली आणि त्यासाठी निवडले गेले.

या मोहिमेचे आयोजन प्रा. विदुला कुलकर्णी (अध्यक्षा-प्लेसमेंट सेल) यांच्यासह समिती सदस्य प्रा. बुशरा अन्सारी, प्रा.जाहिद खान, प्रा. तेजल धरमसी, प्रा. जैबुनिसा, प्रा. ज्योती यादव आणि प्रा. अब्दुल कादिर. प्रा. शीला वारभुवन (उपप्राचार्य), डॉ. रोसेलिन लिमिट्टा (समन्वयक) आणि या मोहिमेसाठी प्रा. शीला वारभुवन (उपप्राचार्य), डॉ.रोसेलिन लिमिट्टा (समन्वयक) यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# हार्बर मार्गावर आज मेगाब्लॉक

**नवी मुंबई : बातमीदार**

रेल्वेवरील रुळ, सिग्नल यंत्रणा, ओव्हर हेड वायरची देखभाल आणि दुरुस्तीची कामे करण्यासाठी रविवारी हार्बर आणि पश्चिम रेल्वेवर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. मध्य रेल्वेच्या हार्बर मार्गावरील कुर्ला ते वाशी अप-डाऊन मार्गावर, पश्चिम रेल्वेवर सांताक्रूझ ते गोरेगाव अप-डाऊन जलद मार्गावर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे.

मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गिकेवर कोणताही ब्लॉक नसेल. हार्बर रेल्वे मार्गावर कुर्ला ते वाशी अप आणि डाऊन मार्गावर सकाळी ११.१० ते दुपारी ४.१० वाजेपर्यंत मेगाब्लॉक असेल. म्हणून ब्लॉक कालावधीत सीएसएमटी येथून पनवेल अथवा बेलापूरकडे जाणाऱ्या डाऊन लोकल सेवा रद्द करण्यात येणार आहेत. पनवेल येथून सीएसएमटीसाठी सुटणाऱ्या अप लोकल सेवा रद्द करण्यात येणार आहेत. या ब्लॉक कालावधीत सीएसएमटी ते कुर्ला स्थानकादरम्यान विशेष लोकल धावतील. ब्लॉक कालावधीत ठाणे-वाशी अथवा नेरूळ स्थानकांदरम्यान ट्रान्सहार्बर मार्गावर लोकल सेवा उपलब्ध असतील, असे रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.



# उरण महाविद्यालयात कार्यशाळा

**उरण : रामप्रहर वृत्त**



कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालय अंतर्गत शैक्षणिक संशोधनांमध्ये एक्सेल आणि एसपीएसएसची भूमिका याविषयी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन शनिवारी (दि. ८) सकाळी ११ वाजता करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश संशोधनांमध्ये एक्सेल आणि एसपीएसएस चा वापर कार्यक्षमतेने कसा करावा याविषयी आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. बळीराम एन गायकवाड यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमासाठी लाभलेले प्रसिद्ध व्याख्याते डॉ. सिद्धार्थ आचार्य यांना आमंत्रित करण्यात आले होते. डॉ. आचार्यांनी आपल्या व्याख्यानामध्ये संशोधन पद्धती, संशोधन संसाधने, गणितीय माध्य यांचा वापर डाटा वितरण त्यावरील प्रक्रिया त्यासाठी लागणारा वेळ याविषयी उत्कृष्ट असे मार्गदर्शन केले. तसेच संशोधन प्रक्रियेमध्ये एसपीएस सॉफ्टवेअरचा वापर, प्रक्रिया, टेस्ट, तपासणी इत्यादी डेटा प्रक्रिया कशा कराव्यात याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेमध्ये संशोधन करताना आकडेवारी प्रक्रिया करण्याचे ज्ञान प्राप्त झाले. कार्यशाळेचे आयोजन गुणवत्ता सुधार समिती आणि पीएचडी विभाग अंतर्गत करण्यात आले. सदर कार्यशाळेमध्ये व्याख्यात्याचे स्वागत परिचय डॉ. पराग कारुळकर सर यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. हन्नत शेख यांनी केले. कार्यशाळेचा तांत्रिक विभाग डॉ. अरुण चव्हाण यांनी उत्कृष्टपणे पूर्ण केला. सदर कार्यशाळेत पीएचडी विभागातील विद्यार्थी, सर्व प्राध्यापक उपस्थितांमध्ये चर्चा केली व शंका समाधान झाले.

ज्येष्ठ प्राध्यापक व्ही. एस. इंदुलकर यांनी अभिप्राय व्यक्त केला. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. बळीराम गायकवाड सर तसेच अकाउंट विभाग प्रमुख प्रा. के. शामा यांचे उत्कृष्ट मार्गदर्शन लाभले. कार्यशाळेची सांगता प्रा. डॉ. एम जी लोणे यांच्या आभार प्रदर्शनाने झाली. कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे महत्त्वाचे सहकार्य लाभले.





पनवेल : भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत यांनी न्हावे येथील गावदेवी मातेच्या यात्रेनिमित्त देवीचे दर्शन घेतले. सोबत न्हावे सरपंच हरेश्वर म्हात्रे, ग्राम समिती उपाध्यक्ष मोरेश्वर म्हात्रे, महिला मोर्चा तालुका सरचिटणीस लीना पाटील.



# शिवसेना कार्यालयात लोकांना न्याय मिळतो

## राज्याचे पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटील यांचे कर्जत येथे प्रतिपादन

**कर्जत : प्रतिनिधी**

शिवसेनेचे कार्यालय हे न्यायालय आहे. लोकांना न्याय मिळाला नाही की ते शिवसेनेच्या कार्यालयाकडे विश्वासाने येतात. आम्ही हिंदुत्वाशी प्रतारणा केली नाही. भगव्या झेंड्या करता आम्ही भाजपबरोबर युती करून सत्ता स्थापन केली. राष्ट्रवादी काँग्रेसने तीन वेळेस शिवसेना पक्ष फोडला. आम्हाला गद्दार म्हणता आणि काहींना खुद्दार म्हणत असाल तर ते चुकीचे आहे. या मतदार संघातील सर्व गावांसाठी पाणी योजना मंजूर केली आहे. सुमारे पावणे चारशे कोटी रुपयांचा निधी दिला आहे. या योजना योग्य रीतीने पूर्ण झाल्यास नुसत्या पाण्यावर थोरवे निवडून येतील, असे महत्वपूर्ण प्रतिपादन राज्याचे पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी येथे केले.



आमदार महेंद्र थोरवे यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळा आयोजित केला होता. यावेळी विविध लोकोपयोगी समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने दुपारी अपंग व्यक्तींना अन्नधान्य किट व उपयुक्त वस्तूंचे वाटप करण्यात आले. त्यानंतर कर्जत व खालापूर तालुक्यातील महिला बचत गटांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करून महिला बचत गटांना टेंटचे वाटप करण्यात आले.

सायंकाळी कर्जत शहरातील 'बाळासाहेब भवन' या सुसज्ज अशा जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, उद्योग व पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी खासदार श्रीरंग बारणे, आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी यांच्यासह उप जिल्हाप्रमुख भाई गायकर, अमर मिसाळ, मनोहर थोरवे, नगरसेवक संकेत भासे, उल्हास भुरके, गोविंद बैलमारे, संतोष भोईर, कर्जत तालुका प्रमुख संभाजी जगताप, विजय पाटील, शिवराम बदे आदी उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत पंकज पाटील आणि नगरसेवक संकेत भासे यांनी केले. यावेळी मोफत फिरत्या दवाखान्याचे लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी आमदार भरत गोगावले यांनी या भागातील मुख्य रस्त्यासाठी ८० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून देण्यात आला आहे. जलजीवन मिशनच्या माध्यमातूनही भरीव निधी या मतदार संघासाठी मिळाला आहे. राज्याची सत्ता बदलण्याचा उठाव रायगडमधून झाला. मात्र आम्ही मागे राहिलो आहोत. आमचे आमदार व मंत्री जमिनी वरूनच चालत आहेत. कोणाच्याच डोक्यात हवा गेलेली नाही. त्यामुळे चांगलेच काम करू, असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला.

या वेळी आमदार थोरवे यांनी भावनावश होऊन आपली जीवन कहाणी सांगितली. यावेळी व्यासपीठावर उपस्थित असलेल्या मान्यवरांसह सर्वांचेच डोळे पाणावले. सूत्रसंचालन अभिषेक सुर्वे यांनी केले.

### लोकांच्यासाठी काम करणारा कार्यकर्ता म्हणजे महेंद्र थोरवे

खासदार श्रीरंग बारणे यांनी, लोकांमध्ये राहून लोकांच्यासाठी काम करणारा कार्यकर्ता म्हणजे महेंद्र थोरवे. त्यांची काम करण्याची पद्धत फार वेगळी आहे.' असे सांगितले. उदय सामंत यांनी, 'कुणी कितीही टीका केली आरोप केले तरी पुढील आमदार महेंद्र थोरवेच असतील. पाठपुरावा करायचा असेल तर त्यांनीच करावा. २८८ पैकी थोरवे हे एकमेव आमदार निधी आणण्यात वाकबदार आहेत. मलाही त्यांच्याकडे त्या विषयाची शिकवणी लावावी लागणार आहे.' असे स्पष्टपणे सांगितले.

# नागोठण्यात भाजप स्थापना दिन साजरा

**नागोठणे : प्रतिनिधी**

भाजपा कार्यालयाच्या प्रांगणात आनंद लाड, सरचिटणीस भाजपा रोहा तालुका यांच्या हस्ते ध्वजारोहण करून व पेढे वाटून भाजपा स्थापना दिवस साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास उपाध्यक्ष भाजपा रोहा तालुका, प्रमोद गोळे कोषाध्यक्ष, भाजपा रोहा तालुका अशोक अहिरे अध्यक्ष, भाजपा रोहा तालुका- शिक्षण सेल धनराज उमाळे उपाध्यक्ष, भाजपा रोहा तालुका शिक्षण सेल, शेखर गोळे अध्यक्ष जि. प. गणपरिषद, मुग्धा गडकरी, सरचिटणीस नागोठणे विभागीय महिला मोर्चा तीरथ पोलसानी, भाजपा सरचिटणीस नागोठणे शहर विवेक रावकर, मनोज धात्रक, माजी ग्रा.पं.सदस्य व ज्येष्ठ नागरिक आणि इतर अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. आनंद लाड यांनी प्रास्ताविक केले.




## माजी सैनिक कल्याण संघटकांचा दौरा

**अलिबाग :** जिल्ह्यातील माजी सैनिक, विधवा पत्नी, अवलंबित यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देणे, आर्थिक मदतीची प्रकरणे, पेन्शन विषयक कामे, नामनिर्देशन, माजी सैनिक ओळखपत्रे, दुसरे महायुद्ध हयातीचे दाखले इत्यादी कामाकरिता महिन्याचा दुसरा व चौथा मंगळवार, सैनिक विश्रामगृह, पोलादपूर, महिन्याचा दुसरा व चौथा बुधवार सैनिक विश्रामगृह, माणगाव येथे माजी सैनिक कल्याण संघटक शेख युनुस शेख यांचा नियोजित दौरा निश्चित करण्यात आला आहे.

# डॉ. श्रद्धा पटेलचे एमबीबीएस परीक्षेत यश

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहरातील श्रद्धा पटेल हिने एम.बी.बी.एस परीक्षेत चांगले यश प्राप्त करून तिने हि परीक्षा ए ग्रेड ने उत्तीर्ण होऊन सर्वांचे लक्ष वेधले आहे.



लहानपणापासूनच श्रद्धा अभ्यासात हुशार असल्याने तिचे प्रथमपासूनच डॉक्टर बनण्याचे स्वप्न होते. एम.बी.बी.एस होण्यासाठी तिने कठोर परिश्रम घेत परीक्षा ए ग्रेड ने उत्तीर्ण करण्याचा मान मिळवला आहे. श्रद्धा पटेल हिने सोलापूर येथील डॉक्टर वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे २०१८ साली प्रवेश घेऊन तिने आपले एम.बी.बी. एसचे शिक्षण पूर्ण केले आहे.

मुरुड तालुक्यातील साळाव येथील जिंदाल विद्यालय येथे पहिली ते दहावीचे शिक्षण पूर्ण केले आहे. तद्नंतर १२ विज्ञान शाखेत मुंबई येथे शिक्षण पूर्ण केले.दहावीला तिला ९५.०५ टक्के गुण होते. तर बारावी विज्ञान शाखेत तिला ९२.०८ टक्के एवढे गुण मिळाले होते.

तिने पीजी नीट परीक्षा देऊन एम.डी /एम.एस येथे प्रवेश घेण्याची इच्छा व्यक्त केली आहे. तिच्या या यशाबद्दल जंजिरा मेडिकल असोसिएनचे सर्व डॉक्टर ,पत्रकार व सर्व हितचिंतक यांनी अभिनंदन केले आहे.

# डॉ. सादिया फारूकी यांना 'पीएचडी' प्रदान

**माणगाव : प्रतिनिधी**

डॉ. सादिया मोहम्मद फारूकी मालेगाव यांना सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी अंतर्गत युगस्त्री फातिमाबी शेख या विषयावर रविवार दि. २ एप्रिल २०23 रोजी पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.

यानिमित्ताने सर्व फातिमाच्या लेकिंनी डॉ. सादिया मॅडम यांना शुभेच्छा देण्यासाठी गुगल मीटवर ऑनलाईन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी डॉ. सादिया अनिसा शेख, दिलशाद सय्यद, मलेका शेख-सैय्यद, जस्मिन शेख, तहेसीन सैय्यद, शबाना मुल्ला,अख्तर पठाण, सायराबानू चौगुले, नसीम जमादार, डॉ. बेनझीर शेख हे उपस्थित होते. नसीम जमादार, तहेसीन सैय्यद, जस्मिन शेख, शबाना मुल्ला, अख्तर पठाण, डॉ. बेनझीर शेख या सर्वांनी डॉ. सादिया यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या . सूत्रसंचालन मलेका शेख -सैय्यद यांनी केले.

# इच्छाशक्ती प्रबळ असेल तर करिअर सुंदर बनते

## चौक येथे प्रा. विजय नवले यांचे व्याख्यानात मार्गदर्शन

**चौक : प्रतिनिधी**

बुद्धीमता असणे महत्वाचे असेल तरी इच्छाशक्ती प्रबळ असली पाहिजे तरच जिवनात करियर सुंदर बनविता येते,एकच विचार आणि त्यावर फोकस ठेवा म्हणजे यशाचं शिखर गाठण्यासाठी वेळ लागणार नाही, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध व्याख्याते विजय नवले पुणे यांनी केले.



आधार द्यावा, आधार घ्यावा, उत्कर्ष व्हावा सकलांचा या नुसार गेली अनेक वर्षे आधार चॅरिटेबल ट्रस्ट चौक यांच्या माध्यमातून संस्थापक अध्यक्ष प्रभाकर देशमुख सामजिक कामाबरोबर खालापूर तालुक्यातील सर्व ई.१० व १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी करिअरच्या नव्या वाटा याचे मोफत मार्गदर्शन शिबिर चौक येथील यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय येथे आयोजित करतात.

यावेळी मार्गदर्शन शिबिरात व्याख्याते विजय नवले बोलत होते. मार्गदर्शन शिबिराला मुलींची संख्या अधिक होती, त्यामूळे ते म्हणाले महीला कुठल्याच क्षेत्रात कमी नव्हत्या, फक्त त्यांची संख्या कमी होती. आपली बाजू नीट मांडा. आपला मुद्दा योग्य मर्गाने ठेवा. काम पूर्ण झाल्यावर वरिष्ठांना सांगा व पुढच्या कामाबद्दल बोला. स्वतःचे मूल्यांकन करा.त्यामूळे स्वतःचे मूल्यमापन होऊन आपला कमकुवतपणा ओळखून ताकद बनविण्यास मदत होते. फालतू चर्चेत वेळ घालू नका. शहानी माणसं समजून घेतात. अभ्यासाच्या माध्यमातून काम करणे, कष्ट करणे, आवडीच करिअर निवडा. निर्णय बरोबर असला तरी प्रक्रिया चुकते, एक विचार एक फोकस ठेवा असे मार्गदर्शन त्यांनी केले.

देशमुख मराठा समाज मंडळ अध्यक्ष उल्हासराव देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व त्यांचे प्रबोधन करणे यासारखे सामाजिक काम नाही. प्रभाकर देशमुख यांनी हा वारसा पुढे चालवत राहावे असे आवाहन केले. या मार्गदर्शन शिबिराच्या स्तुत्य उपक्रमाबद्दल अनेक विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी आयोजकांचे आभार मानले. तर अनेकांनी आपल्या शंकांचे निरसन व्याख्याते विजय नवले यांच्याकडून करून घेतले. विद्या प्रसारण मंडळाचे उपाध्यक्ष अविनाश देशमुख, सरचिटणीस योगेंद्र शहा, उद्योगपती विलास देशमुख, सुभाष देशमुख, दिलीप देशमुख आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद कुंभार, तर आभारप्रदर्शन निखिलेश देशमुख यांनी केले.

# कोरोनाशी मुकाबला करण्यासाठी यंत्रणा सज्ज

### माणगाव उपजिल्हा रुग्णालयासह आरोग्य यंत्रणा कार्यक्षम

**माणगाव : प्रतिनिधी**

दोन वर्षापूर्वी हैदोस माजविणाऱ्या महामारी कोविडमुळे अनेक कुटुंबांना याची झळ बसली होती. अनेकांचे संसार उद्धवस्त करणाऱ्या या कोरोनाने जगण्याची नवी दिशा दिली होती. त्यानंतर नागरिक या महामारीतून कसेबसे सावरले तोच पहिली, दुसरी लाट लोटली. मात्र इथली आरोग्य यंत्रणा एवढी जागृत व सक्षम होती त्यामुळे ओमायक्रॉन सारख्या संभाव्य संसर्गाशी मुकाबला करण्यात सर्वांनाच यश आले. त्यानंतरच्या प्रदीर्घ विश्रांतीनंतर पुन्हा कोरोनाने डोके वर काढले असून तालुक्यात ग्रामीण भागात पाच कोविड रुग्ण आढळले असून त्यांच्याच घरात सात दिवसासाठी विलगीकरण करण्यात आले आहे. या कोरोनाशी समर्थपणे मुकाबला करण्यासाठी माणगाव उपजिल्हा रुग्णालय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र व त्यावर काम करणारे कर्तव्यनिष्ठ आरोग्य कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी संसर्गाशी मुकाबला करण्यासाठी सर्व यंत्रणा सतर्क झाली आहे.




तालुक्यात एक उपजिल्हा रुग्णालय व सहा प्राथमिक आरोग्य केंद्र असून आरोग्य केंद्रे निजामपूर, शिरवली, साई, गोरेगाव, इंदापूर व नांदवी येथे कार्यरत आहेत. या ठिकाणी पुरेसे वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी वर्ग व पुरेसा औषधासाठी तसेच रुग्ण वाहिकेच्या उत्तम, वातानुकूलित रुग्णवाहिका उपलब्ध आहे. ही सर्व यंत्रणा या कोरोनाला परतवण्यासाठी रात्रंदिन झोकून काम करणार आहे. शासनाच्या वेळोवेळी येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून रुग्णांना जास्तीत जास्त सेवा पुरवून आपले कर्तव्य बजावणार आहेत.

# माणगावात कुणबी समाजाचा मेळावा उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहर कुणबी समाज संघटना यांच्या विद्यमाने कुणबी समाज स्नेहमेळावा शुक्रवार दि. ७ एप्रिल २०२३ रोजी सायंकाळी ६ वाजता माणगाव नगरीचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांच्या अध्यक्षतेखाली व माणगाव तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे अध्यक्ष महादेवराव बक्कम यांच्या प्रमुख उपस्थितीत कुणबी भवन माणगाव याठिकाणी विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.



मेळाव्यास माणगाव तालुका कुणबी समाज मंडळाचे खजिनदार रामभाऊ टेंबे, सचिव शांताराम भोरावकर, कुणबी सेवा चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई अध्यक्ष निलेश सत्वे, माणगाव पंचायत समितीच्या माजी सभापती संगीत बक्कम, माणगाव नगरीचे माजी नगरसेवक नितीन बामगुडे, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, माजी उपनगराध्यक्ष संदीप खरंगटे, सुधाकर पालकर, शंकर शिंदे गुरुजी, शांताराम खाडे महाराज, शिक्षिका अपूर्वा जंगम, साले ग्रामपंचायतीचे माजी सरपंच संजय बक्कम आदी उपस्थित होते.

मेळाव्यात बळीराम चव्हाण यांचे गीतमंच, विवा कॉलेजचे विविध कलागुणदर्शन व नाटक, माणगाव येथील काजल डान्स अकॅडमीतर्फे विविध डान्स असे कार्यक्रम सादर करण्यात येऊन समाज बांधवांचे मनोरंजन करण्यात आले. यावेळी विविध कार्यक्रम सादर करणाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

सूत्रसंचालन मनीषा चव्हाण यांनी तर आभार प्रदर्शन अजित शेडगे गुरुजी यांनी केले. स्नेह मेळावा यशस्वीपणे साजरा करण्यासाठी माणगाव शहर कुणबी समाज संघटनेचे अध्यक्ष संतोष मालोरे, उपाध्यक्ष बळीराम चव्हाण, सचिव सीताराम भोनकर, कार्याध्यक्ष अनिल अंबावले, खजिनदार भालचंद्र खाडे, समन्वयक संदेश नाडकर, सहखजिनदार विश्वास मरवडे, सहसचिव हनुमंत चिंचाळकर, प्रसिद्धी प्रमुख अजित शेडगे, रुपेश वाढवळ, सद्स्य विठोबा शिंदे, दिनेश खडतर, अनंत दळवी,सतिष ढेपे, नंदकुमार जाधव, भारत वाढवळ, योगेश खडतर, विजय शिंदे, नितीन डवले, विवेक ढेपे, सल्लागार कृष्णा पानवकर, प्रकाश खिडबिडे, जनार्दन वडेकर, दामोदर शिंदे, शंकर शिंदे, सतिष केकाणे, शंकर उभारे, सखाराम सत्वे, सुनील बुटे, नितीन खडतर,नितीन उभारे यांनी सहकार्य केले.

# रोहा तालुक्यातील वनसंपदा वाचवण्याची आवश्यकता; नागरिकांच्या सहकार्याची गरज

**रोहे : महादेव सरसंबे**

जानेवारी फेब्रुवारीपासून रोहा तालुक्यात ठीक ठिकाणी वनवे लागण्यास व लावण्यास सुरुवात होते. पुढील कालावधीत मोठ्या प्रमाणात वनसंपदा आगीत जळून जाते. रोहा तालुक्याला मिळालेली वनसंपदा आता वाचवण्याची खरी गरज आहे. अन्यथा भविष्यात विदर्भ मराठवाड्यापेक्षा जास्त उष्णतेची दाहकता अनुभवायला मिळेल एवढे निश्चित.

रोहा तालुक्यात अंदाजे १२५०० हेक्टरने वन परिसर व्यापलेला आहे. या वन परिसरात फळ झाडे, फुल झाडे, औषधी वनस्पती आदींची झाडे मोठ्या प्रमाणात आहेत. यात प्रामुख्याने साग, खैर, आंबा, जांभूळ, करंज, किंजल,चिंच यासह अन्य झाडे मोठ्या प्रमाणात आहेत. करवंद सारखी काही लहान वनस्पतीही मोठ्या प्रमाणात आहेत. कोकणात मोठ्या प्रमाणात पाऊस होत असल्याने याचा फायदा सातत्याने जंगलातील झाडांना झाला आहे. त्याचप्रमाणे वन्यप्राण्यांनाही झाला आहे. जंगल संरक्षित राहिल्याने वनप्राण्यांनाही त्याचा फायदा होतो. परंतु मागील काही काळापासून झालेले जंगल तोड, उन्हाळ्यात लागत असलेला वनवा यासह निसर्ग चक्रीवादळामुळे मोठ्या प्रमाणात जंगलाची हानी झाली आहे. जंगल तोड व वनव्यावर काही प्रमाणात वन खात्याने नियंत्रण आणले आहे. प्रयत्न चालू आहेत. परंतु मागील काही कालावधीत झालेले जंगलाचे हानी भरून काढण्याची आवश्यकता आहे. यासाठी वन खाते प्रयत्नशील आहेच. परंतु नागरिकांनीही, सामाजिक संस्थांनीही वन परिसरात झाडे वाढवण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.



जंगल वाचवण्याची आज गरज आहे जंगल वाचल्यास हवामान चांगला राहील. पाण्याची चांगली उपलब्धता राहील. वन प्राण्यांसह नागरिकांना करवंदे, आंबे, जांभूळ, चिंच यास अन्य फळे मिळतील. व नैसर्गिक रित्या आलेल्या वनौषधी चे संरक्षण व संवर्धन होईल. परंतु यासाठी वन खात्याबरोबर नागरिकांनीही सहकार्य करण्याची आवश्यकता आहे जंगल वाचवल्यास आपल्या भावी पिढीला त्याचा निश्चितच फायदा होईल.

सध्या कळसगिरी, कुभोंसी आदी जंगल हिरवळ दिसत आहे परंतु अवचित गड परिसर पाहता या ठिकाणी झाडे मोठ्या प्रमाणात नसल्याचे दिसून येत आहे. बऱ्यापैकी चणेरा परिसरात ही झाडे दिसून येतात. या सर्व बाबींचा विचार करता उपलब्ध असलेली जंगल संपत्ती वाचवण्याची आवश्यकता आहेच. परंतु मोठ्या प्रमाणात नव्याने वृक्ष लागवड करण्याची आवश्यकता आहे. वनव्यामुळे मोठ्या प्रमाणात वन परिसराला लागून असलेल्या खाजगी बागायतदारांना मोठा फटका बसला आहे.

### वनवे प्रतिबंधक उपाययोजना

वन खात्याकडून वनवे प्रतिबंधक उपाययोजना करण्यात येत असल्याचे वनाधिकारी मनोज वाघमारे यांनी सांगितले. यामध्ये प्रामुख्याने जंगला सभोवती जाळ रेषा घेऊन आग लागणार नाही याबाबत दक्षता घेतली जाते. लोकांमध्ये जनजागृती करून व वणव्याबाबत लोकांना जागृत करण्याचे प्रयत्न केले जातात. आग लागताच त्या ठिकाणी जाऊन वन कर्मचारी मजुरांच्या साहाय्याने आग विझवण्याचे काम करतात.

### सर्वांनीच पुढाकार घ्यावा!

वृक्ष लागवड पूर्वी नैसर्गिकरित्या होत होती परंतु वनव्यामुळे आजही होताना दिसत नाही. त्यामुळे सर्वांच्या सहकार्याने जंगल वाचवण्याची आवश्यकता आहे. वनव्यावर उन्हाळ्यात कशा पद्धतीने नियंत्रण मिळता येईल अथवा वनवे लागू नये यासाठी सर्वांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. लागत असलेला वनवा रोखण्यासाठी वन विभागाकडून ठोस कृती आराखडा तयार करण्याची आवश्यकता आहे. आग विझवण्यासाठी वन विभागामार्फत फायर ब्लोअरचा पुरवठा करण्यात आला आहे.

# मोखाड्यातील सोहळा
































दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com